**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५६/२०१०.**

श्री. रविंद्र मारोती गडेकर,
मु. पो. अडयाळ (मंढई पेठ), ता. पवनी,
जि. भंडारा - ४४१ ९०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. डब्ल्यू. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पवनी,
जि. भंडारा.

श्री. एच. एम. खंडाईत,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, अडयाळ,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम पंचायत, अडयाळ, ता. पवनी यांचेकडे अडयाळ ग्रामपंचायतने सन २००६ ते २०१० पर्यंत गावातील लोकांना कोणती कामे उपलब्ध

करुन दिली. त्याची वर्षानुसार कामांची माहिती व कामगारांची संख्या मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्त्यास अपूर्ण माहिती उपलब्ध झाल्यामुळे प्रथम अपील दिनांक १८.५.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी निर्णय दिलेला दिसून येतो. तथापी त्या निर्णयानंतरही संपूर्ण माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली माहिती अधिकारी ग्राम पंचायत, अडयाळ यांचेकडे माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत, अडयाळ यांनी त्यांचेकडील दिनांक ३०.४.२०१० च्या पत्राने फक्त २००७-०८ ची माहिती दिली. मात्र सन २००७-०८, २००८-०९, २००९-१० ची माहिती त्यांनी दिली नाही. सदरची माहिती अपूर्ण मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पवनी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना संपूर्णपणे माहिती मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले. तसेच अपीलकर्ता यांनी सुनावणीत असेही नमुद केले की, त्यांना पूर्ण माहिती प्राप्त न झाल्यामुळे जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करुन त्यांनी नुकसान भरपाईची मागणी केली.

४. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत, अडयाळ यांनी आजच्या सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहिती अधिकाराखालील अर्जाप्रमाणे त्यांनी दिनांक ३०.४.२०१० च्या पत्राने अपीलकर्ता यांना सन २००७-०८ मध्ये ग्रामपंचायत मार्फत झालेली कामे व मजूर संख्या यांची माहिती दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्याला मिळाली असल्याचे अपीलकर्ताने सुनावणीत नमुद केले. तथापी अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांना सन २००६-०७, २००७-०८ व २००९-१० मध्ये ग्रामपंचायत अडयाळने कोणतीही कामे उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे या ३ वर्षाची माहिती निरंक आहे. त्यावर अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, या ३ वर्षाची माहिती निरंक असल्यास निरंक माहिती त्यांना कळविणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी केलेली नाही.

... ३

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी अपीलाचा निर्णय देऊन त्यात असे नमुद केले की, सचिव, ग्राम पंचायत, अडयाळ हयांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु सदर मिळालेली माहिती समाधानकारक नसल्याचे अपीलकर्ता यांचे म्हणणे असल्यामुळे अपीलकर्ता यांना ग्रामपंचायत रेकॉर्ड दिनांक २२.६.२०१० रोजी सचिव यांनी दाखवावे. तथापी अपीलकर्ता हे ग्राम पंचायत मध्ये रेकॉर्ड पाहण्यासाठी आले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जानुसार ग्रामपंचायत, अडयाळकडे सन २००६ ते २०१० पर्यंत अडयाळ ग्रामपंचायतने गावातील लोकांना कोणती कामे उपलब्ध करुन दिली त्याची वर्ष निहाय माहिती आणि कामगारांची संख्या मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, अडयाळ यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३०.४.२०१० च्या पत्रानुसार सन २००७-०८ ची माहिती दिल्याचे दिसून येते. मात्र सन २००६-०७, २००८-०९ व २००९-१० ची माहिती दिल्याचे दिसून येत नाही. या ३ वर्षाबाबत जनमाहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, या ३ वर्षाची माहिती निरंक आहे. तथापी निरंक माहिती अपीलकर्त्यास कळविणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी केलेली दिसून येत नाही. या ३ वर्षाची निरंक माहिती अपीलकर्त्यास कां कळविली नाही याचा कोणताही खुलासा जनमाहिती अधिकाऱ्यांनी सुनावणीत केला नाही म्हणून याबाबीस जनमाहिती अधिकारी हे सर्वस्वी जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी सन २००६-०७, २००८-०९ व २००९-१० या ३ वर्षाची माहिती निरंक असल्याबाबत कळवावे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांचे आंत अपीलकर्त्यास पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २०००/- ची शास्ती लादण्यात येते.

३) सदरच्या शास्तीची रक्कम खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी, जि. भंडारा यांनी जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे व तसे आयोगास कळवावे.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१२९८-१३०१/१.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५५/२०१०.**

श्री. रविंद्र मारोती गडेकर,
मु. पो. अडयाळ (मंढई पेठ), ता. पवनी,
जि. भंडारा - ४४१ ९०३. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. डब्ल्यू. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पवनी,
जि. भंडारा.

श्री. एच. एम. खंडाईत,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, अडयाळ,
ता. पवनी, जि. भंडारा. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.३.२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, अडयाळ, ता. पवनी, जि. भंडारा यांचेकडे सन २००२ च्या यादीनुसार किती गरजू लोकांना घरकुल वाटप करण्यात आलेला आहे त्याची नावे देण्यात यावी व घरकुल

... २

वाटपाबाबतचे नियम निकष सरकारी जी.आर. परिपत्रक देण्यात यावे अशी माहिती मागितलेली होती. अर्जाचे अनुषंगाने पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांचेकडे दिनांक १८.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी होऊन दिनांक २१.६.२०१० रोजी निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. त्यानंतरही अपीलकर्ता यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झालेली नसल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जानुसार दिनांक १५.४.२०१० रोजी अपीलकर्त्याला माहिती पाठविली असून त्या माहितीमध्ये असे नमुद केले की, सन २००२ च्या प्रतिक्षा यादीनुसार पंचायत समिती, पवनी कडून घरकुल वाटप करण्यात येतात. त्यांची नावे पंचायत समितीलाच उपलब्ध आहेत. तसेच घरकुल वाटप शासन निर्णय पंचायत समितीमध्येच मिळेल असे त्यांनी अपीलकर्त्यास कळविल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, घरकुल मंजूरीचे आदेश हे पंचायत समितीकडून मंजूर करण्यात येतात व पंचायत समितीकडूनच घरकुल वाटप करण्यात येतात. त्यामुळे सन २००२ मध्ये पंचायत समितीने जे घरकुल वाटप केले आहे त्याची यादी ग्रामपंचायत मध्ये नाही. सदरची माहिती पंचायत समितीकडेच उपलब्ध आहे. तसेच घरकुल वाटपाचा शासन निर्णय देखील ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, पवनी यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.६.२०१० रोजी दिलेला असून त्या निर्णयात असे नमुद केले की, सचिव, ग्रामपंचायत, अडयाळ हयांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु सदर उपलब्ध करुन दिलेली माहितीबाबत अर्जदाराचे समाधान झाले नाही असे अर्जदारानी सांगितले. म्हणून अर्जदारास दिनांक २२.६.२०१० रोजी ग्राम पंचायत, अडयाळ येथे घरकुल वाटप रेकॉर्ड दाखवून त्यांना पाहिजे

असलेली माहिती घेण्याबाबत निर्णय दिला. मात्र अपीलकर्ता दिनांक २२.६.२०१० रोजी ग्रामपंचायत, अडयाळ येथे रेकॉर्ड पाहण्यासाठी गेले नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक १५.४.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास सन २००२ च्या प्रतिक्षा यादीनुसार पंचायत समिती, पवनी कडून घरकुल वाटप करण्यात येतात. त्यांची नावे पंचायत समितीत उपलब्ध आहेत. ग्राम पंचायतकडे घरकुल वाटपाची नावे उपलब्ध नाही. तसेच घरकुल वाटपाचा शासन निर्णय हा देखील ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध नसल्याने सदरचा शासन निर्णय पंचायत समितीकडून मिळेल असे अपीलकर्त्यास कळविले आहे. यावरुन असे दिसून येते की, ग्राम पंचायतमध्ये अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नाही. सदरची माहिती अपीलकर्त्याने पंचायत समिती, पवनी कडून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३०२-१३०४/१.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५४/२०१०.

श्री. रविंद्र मारोती गडेकर,
मु. पो. अडयाळ (मंढई पेठ), ता. पवनी,
जि. भंडारा - ४४१ ९०३. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. जे. डब्ल्यू. राऊत,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, पवनी,
जि. भंडारा.

श्री. एच. एम. खंडाईत,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, अडयाळ,
ता. पवनी, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, अडयाळ यांचेकडे सन २००८-२००९ या कालावधीत अडयाळ ग्रामपंचायतला अंगणवाडी

... २

दुरुस्तीसाठी किती रक्कम मंजूर झाली होती व किती रक्कम खर्च करण्यात आली. कोणत्या वार्डातील अंगणवाडीवर किती खर्च करण्यात आला याची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दिनांक १८.५.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २१.६.२०१० रोजी घेण्यात आली व सुनावणीचे निर्णयानंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली ाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांच्या अपेक्षेप्रमाणे मिळाली नाही व प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा त्यांना अपेक्षित माहिती मिळालेली नाही. आज सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०१० च्या माहितीच्या अर्जानुसार सन २००८-०९ मध्ये अंगणवाडी दुरुस्तीबाबत ग्राम पंचायत, अडयाळला कोणतीही रक्कम मंजूर झालेली नाही व खर्च सुध्दा झालेला नाही. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १५.४.२०१० च्या पत्राद्वारे डाकेद्वारे कळविण्यात आलेले आहे.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, प्रथम अपीलाची सुनावणी त्यांनी दिनांक २१.६.२०१० रोजी घेतली व असा निर्णय दिला की, सचिव, ग्रामपंचायत, अडयाळ हयांनी अर्जदारास माहिती उपलब्ध करुन दिली आहे. परंतु सदर मिळालेली माहिती समाधानकारक नसल्याचे अपीलकर्ता यांनी म्हटले आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.६.२०१० ला ग्रामपंचायत, अडयाळ येथे उपस्थित राहून रेकॉर्डची पाहणी करावी. तथापी अपीलकर्ता दिनांक २२.६.२०१० रोजी रेकॉर्ड पाहण्यासाठी गेले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

५. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला त्यांचेकडील दिनांक १५.४.२०१० च्या पत्रानुसार ग्रामपंचायत, अडयाळला सन २००८-०९ मध्ये अंगणवाडी दुरुस्तीकरिता कोणतीही रक्कत प्राप्त

झाली नाही व खर्च सुध्दा झालेला नाही असे कळविले आहे व सदरचे पत्र अपीलकर्ता यांना प्राप्त झाल्याचे त्यांनी कबूल केले. मात्र अपीलकर्त्यांनी असे नमुद केले की, अंगणवाडीची दुरुस्ती झालेली आहे. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अंगणवाडी दुरुस्ती २००९-१० मध्ये झालेली असून २००८-०९ मध्ये दुरुस्ती झालेली नाही. अपीलकर्त्याने २००८-०९ ची माहिती मागितलेली होती म्हणून २००८-०९ ची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सन २००८-०९ ची त्याच कालावधीची माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-            दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३०५-१३०७/१.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६२/२०१०.

श्री. ओमप्रकाश जुगलकिशोर अग्रवाल,
शिवाजी चौक, ता. जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष भू अर्जन अधिकारी (सामान्य),
ता. जि. वर्धा.

जनमाहिती अधिकारी तथा
विशेष भू अर्जन अधिकारी (सामान्य),
ता. जि. वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विशेष भू संपादन अधिकारी, (सामान्य) वर्धा यांचेकडे दै. युवा समूहच्या बकाया जाहिरात बिलांची माहिती व कोणत्या विभागाला कोणते बिल पाठविले यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २२.११.२०१० व दिनांक २६.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे निवेदन सादर केले व त्यात संबंधित विभागाने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देऊन त्यांचे पूर्ण समाधान केले आहे. करिता अपील परत घेत आहे असे नमुद केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३०८/२.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५९/२०१०.

श्री. मो. आरिफ मो. शब्बीर,
गुजरी बाजार, ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. नाझरा पटेल,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
अंजुमन हायस्कूल,
किल्ला रोड, महाल, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक नसलेला माहिती अधिकार अर्ज जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अंजूमन हायस्कूल, किल्ला रोड, महाल, नागपूर यांचेकडे दिलेला असून एकूण ९ मुद्यांवरती माहिती

... २

मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्त्यास दिनांक १४.५.२०१० च्या पत्रान्वये माहिती जनमाहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाली. तथापी सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांनी दिनांक ४.६.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयानंतर देखील त्यांना पूर्ण माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जातील अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती एकूण ९ मुद्यांची होती. तथापी त्यांना २ मुद्यांची माहिती मिळाली व बाकी ७ मुद्यांची माहिती त्यांना मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील ७ मुद्यांची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

४. आज सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचेकडे दिनांक ८.५.२०१० रोजी मिळाला. तथापी सदरच्या अर्जावर अपीलकर्ता यांची सही नाही. तसेच तारीख देखील नाही. सदरचा बिनासहीचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दाखविला. त्यावेळी माहिती अधिकाराच्या अर्जावर सही नसल्याचे व दिनांक नसल्याचे दिसून आले. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत पुन्हा असे सांगितले की, माहिती अधिकाराच्या अर्जावर जरी अपीलकर्ता यांची सही नव्हती तरी देखील त्यांचेकडे एकूण ९ मुद्यांपैकी २ मुद्यांची माहिती त्यांच्या हायस्कूलशी संबंधित होती. त्या २ मुद्यांची माहिती दिनांक १४.५.२०१० चे पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र ७ मुद्यांची माहिती त्यांचे कार्यालयाशी संबंधित नसल्यामुळे ती माहिती उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास कळविले आहे. जनमाहिती अधिकारी यांच्या दिनांक १४.५.२०१० चे पत्राने पाठविलेली माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याबाबत त्यांनी सुनावणीत कबूल केले. तथापी त्या माहितीमध्ये फक्त २ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे अपीलकर्तानी सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे .

अपीलकर्त्याचे प्रथम अपील दिनांक ४.६.२०१० रोजी दाखल केले. त्यावर दिनांक ९.६.२०१० रोजी सुनावणी घेतली व सुनावणी नंतर जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अंजूमन हायस्कूल, नागपूर यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास पुरविण्याबाबत कळविण्यात आले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे एकूण ९ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. त्याला अनुसरुन जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी यांचेकडील दिनांक १४.५.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास एकूण ९ मुद्यांची माहिती दिली असून त्यामध्ये असे दिसून येते की, त्यांचेशी संबंधीत असलेल्या २ मुद्यांची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिली असून ७ मुद्यांची माहिती ही दुस-या संस्थेशी संबंधीत असल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी ७ मुद्यांची माहिती उपलब्ध नाही असे कळविले आहे. म्हणून यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, अंजूमन हायस्कूल यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अपीलकर्त्यास दिलेली आहे व इतर ७ मुद्यांची माहिती अपीलकर्त्यांनी ज्या संस्थेशी संबंधीत आहे त्यांचेकडून घेणे संयुक्तिक राहिल. म्हणून अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्त्यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३०९-१३११/२.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५७/२०१०.**

श्री. श्रीकांत रामचंद्र बोरकर,
बारसेनगर, पाचपावली, डॉ. आंबेडकर मार्ग,
जि. नागपूर - ४४० ०१७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. आर. डी. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.१२.२०१०)**

**निर्णय**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हयातील मान्यता प्राप्त प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांची यादी

... २

त्यांच्या संपूर्ण पत्त्यासह व या शाळाकरिता नियुक्त राज्य जनमाहिती अधिकारी तसेच अपीलीय अधिकारी महोदयांचे नाम, पदनाम व पत्र व्यवहाराचा पुर्ण पत्ता अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाला नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाचे पुढे असे सांगितले की, त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा त्यांना प्राप्त झाला नाही म्हणून अद्यापही त्यांना माहिती मिळालेली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक ३.७.२०१० रोजी प्राप्त झाला. माहिती अर्जाचे अनुषंगाने माहितीचे शुल्क रुपये ४५/- भरणा करण्यासाठी अपीलकर्ता यांना दिनांक ८.७.२०१० रोजी पत्र पाठविले. तथापी अपीलकर्ता यांनी रुपये ४५/- शुल्क भरणा केला नाही. अपीलकर्ता यांनी याबाबत सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी दिनांक ८.७.२०१० चे रुपये ४५/- शुल्क भरण्याबाबतचे पत्र प्राप्त झाले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी शुल्क भरण्याचे दिनांक ८.७.२०१० चे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविल्याबाबतचे जावक रजिस्टरची झेरॉक्स प्रत आयोगासमोर दाखविली. त्यावरुन अपीलकर्त्यास सदरचे शुल्क भरण्याचे पत्र पाठविल्याचे दिसून आले.

४. आज सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेवतीने जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी अपील दाखल केले. सदरच्या अपीलाची सुनावणी घेण्यासाठी त्यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी अपीलकर्त्यास सुनावणीचे पत्र पाठवून सुनावणी दिनांक १८.९.२०१० रोजी उपस्थित राहण्याबाबत कळविले. तथापी सदरच्या सुनावणीचे पत्र अपीलकर्त्यास मिळाले नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३.९.२०१० चे सुनावणीचे पत्र अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविल्याबाबतचे जावक रजिस्टरचा पुरावा आयोगासमोर दाखविले. यावरुन असे दिसून येते की, प्रथम अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित झाले नाही.

५. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहिती अधिकाराखालील माहितीचे शुल्क रुपये ४५/- अपीलकर्ता यांना कळवूनही त्यांनी भरलेले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी आज सुनावणी असे सांगितले की, अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती तयार केलेली असून ती संपूर्ण माहिती तयार आहे ती अपीलकर्त्यास देण्याची संमती त्यांनी आयोगा समोर दिली आणि सदरची माहिती जनमाहिती अधिकारी कडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही अपीलकर्त्याने आयोगा समोर करण्याची कबूली दिली म्हणून अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर उपलब्ध करुन देण्याची संमती दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

## राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४५८/२०१०.

श्री. श्रीकांत रामचंद्र बोरकर,
बारसेनगर, पाचपावली, डॉ. आंबेडकर मार्ग,
जि. नागपूर - ४४० ०१७. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे नागपूर जिल्हयातील मान्यता प्राप्त अनुदानित/विना अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयाची यादी त्यांच्या संपूर्ण पत्त्यासह व या शाळाकरिता नियुक्त राज्य जनमाहिती अधिकारी तसेच अपीलीय अधिकारी यांचे नाव पदनाम व पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक ३१.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांचे अर्जाप्रमाणे मागितलेली माहिती त्यांना मुदतीत मिळाली नाही व प्रथम अपील दाखल केल्यानंतर देखील माहिती मिळाली नाही. तसेच प्रथम अपीलाची सुनावणीची नोटीस त्यांना मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दिनांक ३.७.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्यावेळी तत्कालीन जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. श्रावण राऊत, अधिक्षक हे कार्यरत होते. श्रीमती पंतगे या दिनांक १.९.२०१० रोजी माहिती अधिकारी म्हणून रुजू झालेल्या आहेत. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.८.२०१० रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले होते. तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. राऊत यांनी अपीलकर्त्यास माहितीच्या अधिकाराच्या अर्जावर ३० दिवसाचे आंत कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १७.९.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. परंतु सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर राहिले. त्यामुळे माहिती तयार असूनही अपीलकर्त्यांना माहिती देता आली नाही. प्रथम अपीलाची सुनावणीची नोटीस अपीलकर्त्यास यु.पी.सी.ने पाठविले होते. परंतु सुनावणी नोटीस अपीलकर्त्याला मिळाले नाही असे अपीलकर्त्यांने सुनावणीचे वेळी सांगितले. प्रथम अपीलाची सुनावणीची नोटीस प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडून पोस्टाने पाठविल्याचे दिसून येते.

... ३

४. तथापी सुनावणी दरम्यान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित राहिले असते तर त्यांना सुनावणीचे वेळीच माहिती उपलब्ध करुन देता आली असती. मात्र अपीलकर्ता हे सुनावणीस उपस्थित राहिले नाही म्हणून आता देखील आयोगासमोर अपीलकर्त्याला त्यांनी मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्यास जनमाहिती अधिकारी यांनी संमती दिली आणि सदरची माहिती आयोगासमोर अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली. तथापी सदरची माहिती विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसते व हया विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. श्रावण राऊत हे दोषी आढळून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक श्री. श्रावण राऊत यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३.७.२०१० च्या माहितीचा अधिकारातील प्रथम अपील दाखल होई पर्यंत कोणतीही कार्यवाही केलेली दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्त्यास सुमारे ४ महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. या विलंबास तत्कालीन जनमाहिती अधिकारी श्री. श्रावण राऊत हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियमाचे कलम २०(२) नुसार त्यांना लागू असलेल्या सेवानियमान्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही सक्षम प्राधिकाऱ्याने करावयाची आहे.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे **शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर** यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी व केलेल्या कार्यवाही अहवाल आयोगास कळविण्यात यावा.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३१५-१३१७/२.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६५/२०१०.

श्रीमती द्रोपदाबाई शिवदास रामटेके,
सिध्दार्थनगर, वार्ड नं. २४, टेका नाका,
नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी,
नागरी जमीन कमाल धारणा,
नागपूर.

श्री. के. एस. हेडाऊ,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रस्तुतकार,
नागरी जमीन कमाल धारणा,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१२.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ती यांनी दिनांक २१.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हजर आहेत. त्यांचे वतीने श्री. राहुल गजानन पुराणिक, वकील हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एस. व्ही. देशमुख, सहाय्यक नगर रचनाकार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १३.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नागरी जमीन कमाल धारणा यांचेकडे सर्व्हे नं. १४७/४ व १४८/१८ मौजा नारी, प.ह.नं. ११, ता.जि. नागपूर या विषयी ए ते जे पर्यंतच्या

... २

एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्तीस दिनांक ११.८.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु त्या माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्तीने दिनांक १८.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकाऱ्याकडे अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपील फेटाळले म्हणून अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती यांचे वकीलांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांना त्यांच्याकडील दिनांक १३.७.२०१० च्या माहितीच्या अर्जाप्रमाणे सर्व्हे नं. १४७/४ व १४८/१८ मौजा नारी, प.ह.नं. ११ या मालमत्तेबाबत ए ते जे प्रमाणे म्हणजे एकूण १० मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना दिनांक ११.८.२०१० च्या पत्राने मुद्येनिहाय माहिती प्राप्त झाली. तथापी त्या माहिती सोबत या प्रकरणाचे अंतीम विवरणपत्र व अतिरिक्त घोषीत क्षेत्र व अनुज्ञेय नकाशा उपलब्ध झालेला नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दिनांक १८.८.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २४.९.२०१० रोजी घेण्यात आली. प्रथम अपील दिनांक २९.९.२०१० रोजी फेटाळण्यात आले. त्यामुळे अपीलकर्तीस नकाशा मिळाला नाही असे अपीलकर्तीचे वकीलांनाी सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा प्रस्तूतकार, नागरी जमीन कमाल धारणा, नागपूर यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांचा माहितीचा अर्ज त्यांचेकडे दिनांक १३.७.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना मुद्या क्रमांक ए ते जे पर्यंत म्हणजे एकूण १० मुद्याची मुद्येनिहाय माहिती दिनांक ११.८.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिली. तथापी अपीलकर्तीच्या प्रकरणातील नकाशाची प्रत कार्यालयाचे नस्तीमध्ये उपलब्ध झालेला नाही. या संदर्भात जनमाहिती अधिकारी यांनी आणखी असे सांगितले की, त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या धारिकेत दिनांक ५.११.१९९० चा सर्व्हेअरचा अहवाल उपलब्ध आहे. त्या अहवालामध्ये सदर सर्व्हे नंबरचा नकाशा नसल्याबाबतची नोंद करण्यात आलेली आहे. यावरुन सर्व्हे नं. १४७/४ व सर्व्हे नं. १४८/१८ चा नकाशा सन १९९० मध्ये देखील नव्हता असे धारिकेमध्ये संलग्न असलेल्या सर्व्हेअरचा अहवालावरुन दिसून येते. सदर्हु सर्व्हे नंबरचा सन १९९० मध्ये नकाशा उपलब्ध नसल्याबाबतचा सर्व्हेअरचा दिनांक

५.१०.१९९० चा अहवालाची प्रत अपीलकर्तीच्या वकीलांना आयोगाचे समोर देण्यात आली. त्यावरुन या प्रकरणात सन १९९० साली देखील नकाशाची प्रत उपलब्ध नव्हती. याबाबत अपीलकर्तीचे वकीलांचे समाधान झाले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने हजर झालेले सहाय्यक नगर रचनाकार यांनी सुनावणीत असे सांगितले की, प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक १८.८.२०१० रोजी दाखल झाले. त्याची सुनावणी दिनांक २४.९.२०१० रोजी घेण्यात आली व अपीलकर्तीस उपलब्ध झालेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी पुरविल्यामुळे अपीलकर्तीचे अपील दिनांक २९.९.२०१० रोजी फेटाळलेले आहे.

६. अपीलकर्तीचे वकील तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ती यांना जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक ११.८.२०१० च्या पत्राने त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांना पुरविली आहे. फक्त नकाशा धारिकेत उपलब्ध नसल्याने अपीलकर्तीस पुरविता आला नाही. तथापी सन १९९० मध्ये सर्व्हेअरने नकाशा उपलब्ध नसल्याबाबत अहवालाची प्रत अपीकर्तीच्या वकीलांना आयोगासमोर देण्यात आली. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३१८-१३२०/३.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६४/२०१०.**

श्री. अनंतकुमार टेटे,
मु. पो. गोवर्धन नगर,
ता. तुमसर, जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. किशोर धोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तुमसर, जि. भंडारा.

श्री. अनिल देशमुख,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद (बांधकाम विभाग)
तुमसर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर

... २

परिषद, तुमसर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज देऊन दलित वस्ती क्र. १ प्रभाग क्र. ९ मध्ये ज्या तलावाचे खोदकाम सुरु आहे त्या तलावाच्या विषयीची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, नगर परिषद, तुमसर यांनी अपीलकर्त्यास दिनांक २३.७.२०१० रोजी पत्राने माहिती दिलेली दिसून येते. तथापी सदरच्या माहितीने त्यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, तुमसर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सागितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २९.६.२०१० च्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन दलित वस्ती क्रमांक १ प्रभाग क्रमांक ९ मधील तलावाचे क्षेत्रफळा विषयी सविस्तर माहिती अपीलकर्त्यास व्यक्तिशः उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याची पोच जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत दाखविली. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी त्यांच्याकडे दिनांक २५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १५.९.२०१० रोजी घेतली व त्याच दिवशी निर्णय दिला. प्रथम अपीलाचे निर्णयामध्ये असे नमुद करण्यात आले की, माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जानुसार अर्जदारास दिनांक २३.७.२०१० रोजी माहिती दिलेली आहे. तथापी अपीलार्थी यांना हवी असलेली माहिती नगरपरिषदेमध्ये फोटोग्राफस किंवा इतर प्रकारे उपलब्ध असेल ती या आदेशाच्या दिनांकापासून १० दिवसांच्या आंत विनामुल्य अपीलार्थीस माहिती अधिकाऱ्याने पुरवावी.

४. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर माहिती अधिकारी यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी अपीलकर्त्यास पत्र पाठवून त्यांना असे कळविले की, प्रथम अपीलाचे आदेशानुसार उपलब्ध असलेल्या दस्ताऐवजापैकी नेमकी कोणते दस्ताऐवजाची प्रतची आवश्यकता आहे याकरिता कृपया उपलब्ध दस्ताऐवज पाहणी करण्याकरिता

... ३

दिनांक २२.९.२०१० ला कार्यालयात उपस्थित राहावे. म्हणजे त्या दस्तऐवजाच्या प्रती पुरविणे शक्य होईल. सदरची प्रत अपीलकर्त्यास पाठविली असून ती प्रत मिळाल्याबाबत त्यांचे पत्नीची सहीची पोच म्हणून घेतलेली आहे. तथापी अपीलकर्ता माहिती अधिकारी यांचे कार्यालयामध्ये हजर झाले नाही म्हणून त्यांना आणखी नेमकी कोणती माहिती पाहिजे आहे त्याचा बोध झाला नाही.

५. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीतच्या आत त्यांचेकडील दिनांक २३.७.२०१० च्या पत्राने आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास पाठविलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे पुन्हा माहिती अधिकाऱ्याकडे तलावाचे फोटो उपलब्ध आहेत ते फोटो अपीलकर्त्यास पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास तलावाबाबत फोटोच्या स्वरुपात जी माहिती उपलब्ध आहे ती विनामुल्य पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३२१-१३२३/३.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४६६/२०१०.**

श्री. सुशिल दशरथ ढेंगरे,
विश्वकर्मा नगर, रोड नं. २,
प्लॉट नं. १५, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सुशील वैद्य,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
कळमेश्वर, जि. नागपूर.

श्री. डुमरे,
जनमाहिती अधिकारी तथा
तलाठी,
आष्टीकला, तहसील कळमेश्वर,
जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, कळमेश्वर यांचेकडे मौजा चिचभवन, शेत नं. ३ या शेती वारसदाराचा फेरफार करण्यासाठी केलेल्या अर्जाबाबत काय

... २

कार्यवाही झालेली आहे हयाची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.९.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमेश्वर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक २०.१०.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. तथापी त्याबाबत अपीलकर्त्याचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाऱ्याकडे दिनांक २९.६.२०१० रोजी माहितीचा अधिकाराखाली अर्ज करुन मौजा चिचभवन शेत नं. ३ या शेतीच्याबाबत वारसदारांचा फेरफार करण्यासाठी अर्ज केलेला होता. त्या अर्जाचे संदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितली होती. तथापी विहित मुदतीत ती माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांकडे अपील दाखल केले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना दिनांक २०.१०.२०१० च्या पत्रानुसार माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु सदरची माहिती सुमारे ४ महिने उशिराने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे उशिरा माहिती उपलब्ध झाल्याबाबत संबंधितांविरुध्द कार्यवाही करावी अशा प्रकारे त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे हजर नव्हते. तथापी तहसीलदार, कळमेश्वर हे हजर होते. तहसीलदार, कळमेश्वर हे प्रथम अपीलीय अधिकारी देखील आहेत. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अर्जदारास मौजा चिचभवन, शेत नं. ३ या जमीनीचे वारस फेरफार करण्याबाबत त्यांनी अर्ज दिला होता. त्या अर्जाबाबतची केलेली कार्यवाही अर्जदारास पाहिजे होती. सदरची माहिती तलाठी किंवा नायब तहसीलदार यांनी दिनांक १७.७.२०१० चे पत्रानुसार तलाठी साझा क्र. २३, मौजा चिचभवन यांच्या संदर्भात असल्यामुळे त्यांचेकडून माहिती मागविली. तलाठी यांनी दिनांक २३.८.२०१० रोजी नायब तहसीलदाराकडे माहिती सादर केली. तथापी नायब तहसीलदार तथा जनमाहिती अधिकारी यांचेकडून अनावधानाने सदरची माहिती अपीलकर्त्यास पाठविली नाही. म्हणून अपीलकर्त्याने तहसीलदार, कळमेश्वर यांचेकडे दिनांक २३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर तहसीलदार,

कळमेश्वर यांनी दिनांक २०.१०.२०१० पत्राने अपीलकर्त्यास त्यांच्या माहितीच्या अधिकाराखाली अर्जदारास माहिती स्पीड पोस्टाने पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली मात्र सुमारे ४ महिने उशिराने माहिती मिळाली असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

५. अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार, कळमेश्वर यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दिनांक २९.६.२०१० च्या माहितीचा अर्ज माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, कळमेश्वर यांचेकडे केलेला होता. सदरची माहिती तलाठी, चिचभवन यांचेशी संबंधित असल्यामुळे नायब तहसीलदार, कळमेश्वर यांनी त्यांचेकडील दिनांक १७.७.२०१० च्या पत्राने तलाठी, चिचभवन कडून माहिती मागविली. त्यानंतर तलाठी, चिचभवन यांनी दिनांक २५.८.२०१० रोजी तहसीलदार यांचेकडे माहिती पाठविलेली दिसते. तथापी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी तलाठी यांचेकडून दिनांक २५.८.२०१० रोजी जी माहिती प्राप्त झाली होती त्या माहितीच्या आधारे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. मात्र जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्त्यांने प्रथम अपील तहसीलदार, कळमेश्वर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपील दाखल झाल्यानंतर तहसीलदार, कळमेश्वर यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.१०.२०१० च्या पत्राने माहिती पाठविलेली दिसून येते. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली. मात्र सुमारे ४ महिने उशिराने अपीलकर्त्यास पुरविलेली दिसून येते. यावरुन असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी अपीलकर्त्यास दिनांक २९.६.२०१० च्या माहितीच्या अर्जाचे संदर्भात ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन न देता अपीलकर्त्यास सुमारे ४ महिने विलंबाने माहिती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. या ४ महिन्याच्या माहिती पुरविण्यास विलंबास सर्वस्वी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, कळमेश्वर हे दोषी आढळून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

२) जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, कळमेश्वर यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दिनांक २९.६.२०१० च्या माहितीच्या अर्जाखालील मागितलेली माहिती ३० दिवसांचे मुदतीत उपलब्ध करुन दिली नाही. सदरची माहिती अपीलकर्त्यास सुमारे ४ महिने उशिरा उपलब्ध झालेली आहे. या विलंबास सर्वस्वी जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार हे दोषी आढळून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवानियमान्वये त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

३) सदरची कार्यवाही सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची असून या निर्णयाची प्रत तहसीलदार, कळमेश्वर यांनी सक्षम प्राधिकाऱ्यांकडे कार्यवाहीसाठी पाठवावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७६/२०१०.**

श्री. सी. के. बनपूरकर,
रेणुका माता चौक, भवानी वार्ड, कॉलेज रोड,
ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एम. अंबाडेकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभाग नियंत्रक,
राज्य परिवहन महामंडळ, नागपूर.

श्री. जे. आर. अंभोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
राज्य परिवहन महामंडळ, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली त्यांचे वडीलांना प्रोव्हेन्शीयल ट्रान्सपोर्ट सर्व्हीस, नागपूर या कंपनीने दिलेल्या दिनांक १३.२.१९६२ च्या पत्राची प्रत व त्यांचे वडील श्री. के. एस. बनपूरकर यांना सेवेतून बडतर्फ केले आहे त्याची आदेशाची प्रत जनमाहिती अधिकारी तथा विभागीय

... २

कर्मचारी वर्ग अधिकारी, राज्य परिवहन महामंडळ, नागपूर यांचेकडे मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २४.६.२०१० रोजी विभाग नियंत्रक, राज्य परिवहन महामंडळ, नागपूर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील माहिती उपलब्ध नाही म्हणून प्रथम अपील फेटाळले. त्याकरिता अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत सांगितले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २०.५.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दिनांक १.६.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याचा अर्जातील माहितीचा शोध घेण्यात आला. अपीलकर्त्याने नागपूर येथील प्रोव्हेन्शीयल ट्रान्सपोर्ट सर्व्हीस ही कंपनी असतांना अपीलकर्त्याचे वडील श्री. के. एस. बनपूरकर हे त्या कंपनीचे सेवेत होते. त्यानंतर महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ हे अस्तित्वात आले आहे. अपीलकर्त्यास त्यांचे वडील श्री. के. एस. बनपूरकर यांना दिनांक १३.२.१९६२ रोजी प्रोव्हेन्शीयल ट्रान्सपोर्ट सर्व्हीस, नागपूर या कंपनीने पाठविलेले दिनांक १३.२.१९६२ च्या पत्राची प्रत पाहिजे आहे. तसेच त्यांचे वडीलांची बडतर्फीच्या आदेशाची प्रत पाहिजे. सदरची कागदपत्रे सन १९६२ ची असल्यामुळे त्याचा शोध घेऊनही ती माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक ९.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध नाही म्हणून कळविलेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २३.७.२०१० रोजी प्रथम अपीलाचा निर्णय देऊन असे कळविले आहे की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही ४८ वर्ष जुनी आहे. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती उपलब्ध नसल्याने माहिती अधिकाराखाली माहिती अपील फेटाळलेले आहे.

४. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचे वडील श्री. के. एस. बनपूरकर हे नागपूर येथील प्रोव्हेन्शीयल ट्रान्सपोर्ट सर्व्हीस, नागपूर या कंपनीत नोकरीला होते. त्या कंपनीत नोकरीत असतांना त्या कंपनीने सन १३.२.१९६२ रोजी एक पत्र पाठविले आहे त्या पत्राची प्रत व श्री. के. एस. बनपूरकर यांना बडतर्फ

... ३

केलेल्या आदेशाची प्रत अपीलकर्ता यांनी मागितलेली आहे. तथापी प्रोव्हेन्शीयल ट्रान्सपोर्ट सर्व्हीस, नागपूर या कंपनी नंतर महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ हे अस्तित्वात आलेले आहे. या महामंडळाकडे अपीलकर्त्याने मागितलेली ४८ वर्षाचा जुना रेकॉर्ड उपलब्ध असलेल्या दिसून येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ९.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध नाही म्हणून कळविले आहे ते संयुक्तिक दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-** **दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३४७-१३४९/८.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७५/२०१०.

श्री. इमरान इनायतुल्ला चिश्ती,
अल-जम-जम हॉटेलच्या मागे,
आजमशाह चौक, मस्जिद जवळ,
सेंट्रल एव्हेन्यु रोड, नागपूर - ४४० ००२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्र. २, नागपूर शहर,
नागपूर.

श्री. अनंत थोरात,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सदर विभाग, नागपूर शहर,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. कोकाटे, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,

... २

सदर विभाग, नागपूर शहर यांचेकडे दिनांक ३०.८.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन नगर भुमापन क्र. १ सदर मध्ये असलेला कर्मचारी श्री. जी. बी. डोईफोडे यांचे विरुध्द असलेला दाखल गुन्हा कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ दिनांक १.७.२०१० अन्वये सदर पोलीसाने किती लोकांचे बयान घेतले त्या बयानाची प्रत मागण्याबाबतची माहिती मागितलेली होती. मात्र अपीलकर्त्यास दिनांक १४.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी असे कळविले की, सदर पोलीस स्टेशन येथे अपराध क्र. ३४६२/१० कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा नोंद असून गुन्हा पोलीस तपासावर सुरु आहे. सदरच्या गुन्हयाचा तपास सुरु असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ८(१)(ज) अन्वये माहिती पुरविता येत नाही असे कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ११.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी निकाल देऊन असे नमुद केले की, सदर तपासावरील गुन्हयात दिनांक १८.९.२०१० रोजी "ब" फायनल सादर केल्याचे त्यांचे निदर्शनास आल्याने तपासा दरम्यान घेतलेल्या ५ लोकांच्या जबाबाच्या प्रती आपणास निशुल्क पुरविल्याबाबत जनमाहिती अधिकारी यांना कळविलेले आहे. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली नसल्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून निशुक्ल प्राप्त करुन घ्यावी असा त्यांनी निर्णय दिला.

३. जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात पोलीस स्टेशन, सदर येथे गुन्हा तपासावर होता म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ८(१)(ज) अन्वये माहिती पुरविलेली नाही. मात्र त्यानंतर हया गुन्हयाचा तपास पूर्ण झाल्यानंतर सदरच्या गुन्हयात दिनांक १८.९.२०१० रोजी "ब" फायनल झाल्याने तपासादरम्यान घेतलेल्या ५ लोकांच्या जबाबाच्या प्रती निशुल्क पुरविल्या आहेत. याबाबत अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना ५ लोकांच्या मुळ बयानाची प्रत मिळाली. मात्र ४ लोकांची बयानाची प्रत अद्याप मिळालेली नाही. म्हणून अपीलकर्त्यास ४ लोकांच्या बयान उपलब्ध असल्यास त्याच्या प्रत देखील अपीलकर्त्यास देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास गुन्हा क्रमांक ३४६२/१० मधील ५ लोकांचे दिलेल्या बयानाची प्रत व्यक्तिरिक्त इतर ४ लोकांच्या बयानाच्या प्रती उपलब्ध असल्यास त्या विनामुल्य अपीलकर्त्यास व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसात उपलब्ध करुन द्याव्यात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४७४/२०१०.

श्री. सुनिल लक्ष्मणराव सोनटक्के,
वार्ड नं. ५, नवीन वसाहत,
हनुमान मंदिर जवळ, बुट्टीबोरी,
ता. जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विजय द. धापके,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, नागपूर

श्री. प्रकाश जामगडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत, बुट्टीबोरी,
ता. जि.नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.१२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत, बुट्टीबोरी यांचेकडे शुक्रवारी बाजार येथे बांधलेल्या गाळयाच्या वाटपाबाबत माहिती मागितलेली

... २

होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली नाही म्हणून त्यांनी पुन्हा दिनांक २३.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडे साधा अर्ज देऊन माहिती मागितली त्यानंतरही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १०.८.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नागपूर यांचेकउे प्रथम अपील दाखल केले. परंतु त्यानंतरही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्राम पंचायत, बुट्टीबोरी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दिनांक १८.५.२०१० रोजी प्राप्त झाला होता. तथापी सदरच्या माहितीच्या अधिकाराच्या अर्जावर स्टॅम्प लावलेला नव्हता म्हणून माहिती देण्याबाबतची कार्यवाही केली नाही. याबाबत अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांचा अर्ज हा दारिद्रय रेषेखालील म्हणून अर्ज केलेला होता. म्हणून त्या अर्जाला स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नव्हती असे अपीलकर्त्यांनी सुनावणीत सांगितले. वास्तविक पाहता अपीलकर्ता दारिद्रय रेषेखालील आहेत तर त्यांना कोर्ट फी स्टॅम्प लावण्याची आवश्यकता नाही. हयाची कोणतीही खात्री जनमाहिती अधिकारी यांनी करुन घेतलेली नाही असे सांगितले.

४. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांना अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झालेले नाही. अपीलकर्त्याने असे सांगितले की, प्रथम अपील हे पोस्टाने पाठविले होते. मात्र पोस्टाने पाठविल्याचा कोणताही पुरावा अपीलकर्ता यांनी सुनावणीत दाखविला नाही.

५. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक १८.५.२०१० च्या माहिती अधिकाऱ्याकडे केलेला अर्ज दिला असून त्या अर्जासोबत अपीलकर्त्याने दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्र त्यांचे वडिलांचे लावलेले दिसते. म्हणून याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता खरोखर दारिद्रय रेषेखाली आहे अगर कसे याची खात्रीकरुन घेणे आवश्यक होते किंवा त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्टॅम्प लावणेबाबत कळविणे जरुरीचे होते. मात्र तशी कार्यवाही जनमाहिती अधिकारी यांनी केलेली नाही म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्त्यास त्यांचे कडील दिनांक १८.५.२०१० च्या माहिती अधिकारा खालील अर्जाची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अथवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३५३-१३५५/८.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४८२/२०१०.**

श्री. तुकडू बारीकराव मेश्राम,
रा. मालवनीय नगर, ता. तुमसर,
जि. भंडारा - ४४१ ९१२. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. किशोर धोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, तुमसर,
जि. भंडारा.

श्री. मानकर,
जनमाहिती अधिकारी तथा
लिपिक, (शिक्षण विभाग माध्यमिक)
नगर परिषद, तुमसर, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षण विभाग (माध्यमिक), नगर परिषद, तुमसर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन त्यांच्या सेवापुस्तकाचे पानाची नोंदी

... २

छायांकित प्रतीची मागणी केलेली दिसून येते. तथापी माहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २८.६.२०१० च्या पत्राने अपीलकर्ता यांना सेवापुस्तक त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविलेले आहे. म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १३.७.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, ते नगर परिषद, तुमसर येथे माध्यमिक शिक्षण विभागात शिक्षण पर्यवेक्षक म्हणून कार्यरत होते ते दिनांक २१.१.१९९९ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत. सेवानिवृत्तीनंतर त्यांना काही आर्थिक लाभ मिळालेला नाही ते आर्थिक लाभ मिळावे म्हणून त्यांनी सेवापुस्तकाची छायांप्रती मागितलेली आहे. तथापी त्यांचे सेवापुस्तक नगर परिषद कार्यालयात उपलब्ध नाही असे माहिती अधिकारी यांनी दिनांक २८.६.२०१० रोजी पत्राने त्यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी, नगर परिषद, तुमसर यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आजच्या सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा लिपिक, नगर परिषद, तुमसर यांनी असे सांगितले की, अपीकर्ता यांच्या दिनांक ११.१.२०१० चा माहितीच्या अधिकाराखालील अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला त्या अर्जातील माहितीनुसार त्यांच्या सेवापुस्तकाचा शोध त्यांना झेरॉक्स प्रत उपलब्ध करुन देण्यासाठी नगरपरिषद कार्यालयात घेण्यात आला. तथापी अपीलकर्ता याचे सेवापुस्तक नगरपरिषद कार्यालयात आढळून आले नाही. तसेच सदरची सेवापुस्तिका शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे पाठविलेल्या पत्राची प्रत त्यांना उपलब्ध करुन दिली. म्हणून त्यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी दिनांक २८.६.२०१० च्या पत्राने सेवापुस्तिका उपलब्ध नाही असे कळविले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी नगर परिषद, मुख्याधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल कैल्यानंतर प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार माहिती अधिकारी शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, भंडारा यांनी त्यांचे कार्यालयाकडील दिनांक २३.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्ता यांची सेवापुस्तिका त्यांचे कार्यालयात उपलब्ध होत नाही असे कळविले. त्यामुळे अपीलकर्ता यांना सेवापुस्तिकाची छायांकित प्रती देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत सांगितले.

... ३

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक १३.७.२०१० रोजी दाखल झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ४.८.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय दिनांक ४.८.२०१० रोजी देण्यात आला. सदरच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांना आवश्यक असलेल्या सेवापुस्तिकेची माहिती पुरविण्याकरिता माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे स्वतः जाऊन सेवापुस्तिकेचा शोध घ्यावा आणि १५ दिवसांचे आंत योग्य तो अहवाल नगरपरिषद कार्यालयास कळवावा. त्याप्रमाणे माहिती अधिकारी शिक्षण विभागात गेले. तथापी शिक्षण विभाग भंडारा येथे सेवापुस्तिका उपलब्ध नाही असे दिनांक २३.८.२०१० च्या पत्राने शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांनी कळविले. त्यामुळे अपीलकर्त्यास सेवापुस्तिकेची छायांकितप्रती देता आली नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, मुख्याधिकारी, नगर परिषद, तुमसर यांनी दिनांक २३.५.२००१ च्या पत्राने अपीलकर्त्याचे सेवानिवृत्त प्रकरण मुळसेवा पुस्तिकेसह शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे पाठविलेले दिसून येते. त्यानंतर शिक्षणाधिकारी (माध्यमिक) भंडारा यांनी दिनांक २६.१२.२००१ च्या पत्राने निवृत्ती वेतनाचे प्रकरण मुळसेवापुस्तिकेसह तसेच फार्म सी शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयाकडे पाठविलेले आहे. तथापी त्यांचे कार्यालयाकडून मुळ सेवापुस्तिका शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे सेवानिवृत्ती मंजूरी प्रकरण सोबत प्राप्त झाले किंवा कसे याची शहानिशा शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे कार्यालयात करणे सयुक्तिक होईल. म्हणून आज सुनावणीत अपीलकर्ता व मुख्याधिकारी यांचे संमतीने असे ठरले की, मुख्याधिकारी, अपीलकर्ता यांनी संयुक्तपणे शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे लेखी पत्र व्यवहार करुन स्वतः त्यांचे कार्यालयात उपस्थित राहून त्या मुळ सेवापुस्तिकेचा शोध घ्यावा व शोध घेतल्यानंतर सेवापुस्तक उपलब्ध झाल्यास त्याची छायांकित प्रती विनामुल्य अपीलकर्त्यास पुरवावी म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून मुख्याधिकारी तथा जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, तुमसर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पत्र व्यवहार करावा व अपीलकर्त्याचे सोबत शिक्षण उपसंचालक कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन सेवापुस्तकाचा शोध घ्यावा व सेवापुस्तक उपलब्ध झाल्यास त्याची छायांकित प्रत विनामुल्य अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) सदरच्या निर्णयाची एक प्रत शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे पाठविण्यात यावी. त्यांनी अपीलकर्त्यास सेवापुसितका उपलब्ध होण्यासाठी मुख्याधिकारी, नगरपरिषद, तुमसर व अपीलकर्त्यास त्यांनी योग्य ते सहकार्य करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-          दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३५६-१३५९/९.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४८०/२०१०.

श्री. विठ्ठल नारायण शहारे,
मु. बोटे, पो. म्हसगांव,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. व्ही. आकुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया.

श्री. के. बी. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
ता. गोरेगांव, जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.१२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन मौजा बोटे येथील राजस्व मामला क्रमांक २ प्रकरणाची प्रत. एल.ई.एन. ३९/०७-०८ या अतिक्रमण प्रकरणातील कागदाच्या प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत माहिती

... २

मागितलेली दिसून येते. तथापी विहीत मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे नंतर देखील माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी दिनांक ५.७.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली माहिती अधिकारी तथा तहसीलदार, गोरेगांव यांचेकडे मौजा बोटे, तालुका गोरेगांव येथील राजस्व मामला क्रमांक २ प्रकरणाची प्रत एल.ई.एन.३९/०७-०८ या अतिक्रमण प्रकरणातील संपूर्ण कागदपत्रांच्या प्रती मागितलेल्या होत्या. मात्र सदरच्या प्रकरणाच्या प्रती त्यांना माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून आजपावेतो प्राप्त झाले नाही असे त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक ५.७.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचेकडे पोस्टाद्वारे दिनांक २२.७.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याचा माहितीचा शोध घेतला असता असे दिसून आले की, अपीलकर्त्याने अतिक्रमणाबाबत माहिती अर्जात नमुद केलेले कोणतेही प्रकरण त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही त्याबाबत त्यांनी आवक रजिस्टरचा देखील शोध घेतला. मात्र अशा प्रकारचे कोणतेही प्रकरण त्याचे कार्यालयाकडे प्राप्त झालेले दिसून येत नाही. म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक २.८.२०१० च्या पत्राने असे कळविले की, माहितीच्या अर्जात नमुद केलेले वरील क्रमांकाचे प्रकरण तहसीलदार, गोरेगांव यांचे कार्यालयात पंजीबध्द झाले नाही. म्हणून मागणी केलेल्या प्रकरणाची नकल पुरविता येत नाही असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी कळविले. सदरचे पत्र अपीलकर्त्यास मिळाल्या बद्यल अपीलकर्त्याने सुनावणीत कबूल केले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसीलदार यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा प्रथम अपीलाचा अर्ज दिनांक ५.८.२०१० रोजीचा त्यांचे कार्यालयास टपालाद्वारे दिनांक २१.८.२०१० रोजी प्राप्त झाला. सदर अपीलाची सुनावणी दिनांक १३.९.२०१० ठेवण्यात आली व अपीलात असे दिसून आले की, अपीलकर्त्यांनी मागितलेल्या दस्तऐवजाचे कोणतेही प्रकरण तहसीलदार, गोरेगांव यांचे कार्यालयात दाखल झाले नाही म्हणून ाहिती देता येणे शक्य नाही. करिता प्रथम अपील फेटाळण्यात आले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जात नमुद केलेले कोणतेही प्रकरण माहिती अधिकारी यांचे कार्यालयात प्राप्त झाली नाही त्यामुळे त्या प्रकरणातील कागदपत्राच्या प्रती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आलेल्या नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी केलेले कार्यवाही संयुक्तिक दिसून येते. करिता अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३६०-१३६२/९.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४८१/२०१०.

श्री. बुध्दम यादोराव मेश्राम,
न्यु आशिर्वाद नगर, गिरोला (कारधा),
ता. जि. भंडारा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. यु. एम. वाघाये,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, अर्जुनी/सडक,
जि. गोंदिया.

श्री. एल. बी. चींधालोरे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत, अर्जुनी/सडक
जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय अर्जुनी/सडक यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन ग्रामपंचायत बाबत एकूण १ ते ७

... २

मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना अपूर्ण माहिती मिळाल्यामुळे त्यांनी प्रथम अपील अधिकाऱ्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या नंतर देखील त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, दिनांक ११.६.२०१० रोजी माहिती अधिकारी ग्रामपंचायत, अर्जुनी/सडक यांचेकडे ग्रामपंचायत बाबत एकूण १ त ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. अर्जाचे अनुषंगाने त्यांना माहिती अधिकाऱ्याकडून २ मुद्यांची माहिती मिळाली. बाकी मुद्यांची माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर देखील त्याना संपूर्ण माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्राम पंचायत, अर्जुनी/सडक यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दिनांक ११.६.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जानुसार अपीलकर्त्यास दिनांक १०.७.२०१० रोजी एकूण १ ते ७ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. त्यामुद्यांची एकूण २४ पेजेस त्यांना माहिती दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली आहे असे अपीलकर्त्याने कबूल केले. मात्र अपूर्ण माहिती मिळाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक १८.८.२०१० रोजी घेण्यात आली. त्यावेळेस असे दिसून आले की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास १ ते ७ मुद्यांची माहिती रजिस्टर पोस्टाद्वारे दिनांक १०.७.२०१० रोजी पाठविलेली असून सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याचे त्यांनी मान्य केले. पाठविलेली माहिती एकूण २४ पेजेस होती असे दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांना आणखी काही माहिती पाहिजे असल्यास त्यांनी ग्राम पंचायत कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर त्यांना आणखी जी माहिती पाहिजे असेल ती त्यांनी जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देण्याबाबतचा निर्णय घेतला.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.७.२०१० रोजी रजिस्टर पोस्टाने एकूण १ ते ७ मुद्यांची माहिती पाठविलेली असून त्यामध्ये एकूण २४ सहपत्र आहेत. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी अपीलकर्त्याला आणखी ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे त्या कागदपत्रांचे निरिक्षण ग्रामपंचायत कार्यालयात येऊन पाहणी केल्यानंतर अपीलकर्त्यास आणखी ज्या कागदपत्रांची आवश्यकता आहे ते उपलब्ध करुन देण्याची तयारी जनमाहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत दर्शविली. तसेच अपीलकर्त्यानी देखील ग्राम पंचायत कार्यालयात जाऊन त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्रांचे निरिक्षण करण्यास संमती दिली. म्हणून जनमाहिती अधिकारी व अपीलकर्ता यांचे संमतीने असे ठरविण्यात आले की, अपीलकर्त्यानी दिनांक १.१.२०११ रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून कागदपत्राचे निरिक्षण करावे व निरिक्षणाअंती अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना दिनांक १.१.२०११ रोजी ग्रामपंचायत कार्यालय, सडक/अर्जुनी, जिल्हा गोंदिया येथे जनमाहिती अधिकाऱ्याकडे उपस्थित राहून रेकॉडचे निरिक्षण करावे व त्यांना आणखी पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्याव्यात.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास निरिक्षणानंतर पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४८४/२०१०.

श्री. रमेश भाऊराव आत्राम,
रा. अहेरी, चेरपल्ली रोड, वार्ड नं. ५,
मु. पो. ता. अहेरी, जि. गडचिरोली. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डब्ल्यू. ए. हिवरकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, भद्रावती,
जि. चंद्रपूर.

श्री. ए. आर.कटाईत,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, नंदोरी (बु.),
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत नंदोरी

(बु.), ता. भद्रावती यांचेकडे घरकुलबाबत एकूण ४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २९.११.२०१० रोजी कक्ष अधिकारी, राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचेकडे निवेदन सादर केले की, प्रथम अपीलीय अधिकारी तथा संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, भद्रावती यांचेकडून संपूर्ण दस्तऐवज दिनांक १२.११.२०१० ला प्राप्त झालेली आहेत. करिता दिनांक ९.१२.२०१० ला उपस्थित राहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे लेखी निवेदन सादर केल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४९२/२०१०.**

श्री. राजेश अंबादास भगत,
एम.आय.डी.सी., म्हाडा कॉलनी,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. खंडाळे, नायब तहसीलदार हे हजर आहेत व जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. अजय बाटवे, कनिष्ठ लिपिक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली एम.आय.डी.सी. म्हाडा कॉलनीच्या लगतची अनाधिकृत/अतिक्रमीत दुकाने/कार्यालय उठविण्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना

... २

अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ६.९.२०१० रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णयानंतर पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. आजच्या सुनावणीत अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी यांचेवतीने कनिष्ठ लिपिक हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २९.७.२०१० च्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दिनांक ३१.७.२०१० च्या पत्राने असे कळविले आहे की, शासकीय जमीनीवरील अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करण्याकरिता तहसीलदार सक्षम अधिकारी आहे. म्हणून आपले अर्जावरील पुढील कार्यवाही तहसीलदार, चंद्रपूर यांचे कार्यालयाकडून अपेक्षित आहे असे अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी कळविलेले आहे असे आजच्या सुनावणीत कनिष्ठ लिपिक यांनी सांगितले. मात्र या माहितीमुळे अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ८.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २१.९.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.९.२०१० रोजी घेण्यात आली व जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. या निर्णयाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक ४.१०.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास अतिक्रमण काढण्याबाबत कारवाईचे २ कागदपत्र पाठवून दिलेली दिसतात. सदरच्या २ कागदपत्रामध्ये तहसीलदार, चंद्रपूर यांनी मंडळ अधिकारी घुग्घुस यांनी अतिक्रमणाचा सविस्तर चौकशी अहवाल मागितलेला दिसून येतो.

४. तसेच आजच्या सुनावणीत जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचेवतीने हजर झालेले कनिष्ठ लिपिक यांनी आयोगापुढे असे निवेदन सादर केले की, सदरचे अतिक्रमण हे शासकीय जमीनीवर असल्यामुळे सदरचे अतिक्रमण हे उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १, चंद्रपूर यांचे अखत्यारितील असल्यामुळे त्यांचेकडून काढणे अपेक्षित आहे. म्हणून सदरचे अतिक्रमण काढण्यासाठी दिनांक १८.११.२०१० रोजी नायब तहसीलदार, घुग्घुस यांनी उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक १ यांना देखील कळविले आहे असे सांगितले.

५. जनमाहिती अधिकारी यांनी सादर केलेली कागदपत्रे व त्यांचे कार्यालयातून उपस्थित झालेले प्रतिनिधी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे कार्यालयातून उपस्थित झालेले प्रतिनिधी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दिनांक २९.७.२०१० च्या माहितीच्या अधिकारा खालील अर्जाचे संदर्भातील माहिती बाबत जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, चंद्रपूर यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३१.७.२०१० रोजी कळविलेले दिसून येते. तसेच प्रथम अपीलाचे निर्णयानुसार जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.१०.२०१० च्या पत्राने अतिक्रमण काढण्याबाबतचे कारवाईचे कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली दिसून येतात. तसेच अपीलकर्त्याने सदरची कागदपत्रे कार्यालयात येऊन समक्ष दिनांक ६.१०.२०१० रोजी प्राप्त केलेली आहेत असेही जनमाहिती अधिकारी यांचे प्रतिनिधीनी सांगितले. म्हणून अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३६८-१३७०/१४.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४९४/२०१०.**

श्री. मनोज सुखदेव खोब्रागडे,
रा. राधाकृष्ण टॉकीजचे मागे, बेलेवाडी,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. आर. शिंगाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक वनसंरक्षक (सं.अ.),
वनविभाग, ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर.

श्री. बी. जे. मांढरे,
जनमाहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनविभाग (उत्तर) ता. ब्रम्हपूरी, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे उशिरा हजर झाले व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, ब्रम्हपूरी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन मौजा धानोली तुकुम, ता. ब्रम्हपूरी सर्व्हे नं. ३३४,

आराजी ०.८१ हे.आर. व सर्व्हे क्र. ३३५, आराजी ०.८१ हे.आर. या जमीनीबाबत एकूण ६ मुद्यांवरती माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.८.२०१० रोजी प्रथम अपीलाचा अर्ज दाखल करुन प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ४.८.२०१० रोजी प्राप्त झाले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) उत्तर ब्रम्हपूरी यांचेकडे दिनांक २८.७.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन मौजा धानोरा तुकुम येथील सर्व्हे क्र. ३३४ व ३३५ या जमीनीबाबत एकूण ६ मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. त्यानंतर त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, ब्रम्हपूरी यांचेकडे दिनांक २८.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना प्राप्त झाला नाही मात्र त्यांना दिनांक ११.१०.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचेकडून एकूण ६ मुद्यांवरती माहिती प्राप्त झाली. मात्र सदरच्या माहितीमध्ये त्यांनी मागणी केलेली जमीन हया वन विभागाच्या आहेत की महसूल विभागाच्या आहेत याबाबत त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून सदरच्या जमीनीची त्यांना माहिती पाहिजे आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) उत्तर ब्रम्हपूरी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज दिनांक २८.७.२०१० चा अर्ज त्यांचेकडे दिनांक २८.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला व त्या माहितीची खात्री करुन अपीलकर्त्यास दिनांक ११.१०.२०१० रोजीच्या पत्राने ६ मुद्यांची माहिती वन विभागातील रेकॉर्डवरुन पुरविण्यात आली. सदरची माहिती ही महसूल विभाग, भूमी अभिलेख यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या विभागाकडे माहिती प्राप्त करुन अपीलकर्त्यास दिनांक ११.१०.२०१० च्या पत्राने माहिती

पुरविलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याबाबत अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. मात्र सदरच्या माहितीमध्ये ही जमीन महसूल विभागाची किंवा वन विभागाची आहे याबाबतचा उल्लेख त्या माहितीत नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक वनसंरक्षक, ब्रम्हपूरी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २८.८.२०१० चा प्रथम अपीलीय अर्ज त्यांचे कार्यालयातकडे दिनांक ४.९.२०१० रोजी प्राप्त झाला. सदरच्या प्रथम अपीलावर सुनावणी दिनांक २३.९.२०१० रोजी निश्चित करण्यात आली होती. त्यानंतर दिनांक ५.१०.२०१० ही सुनावणी तारीख ठेवण्यात आली होती. मात्र सुनावणी होऊ न शकल्यामुळे अपीलकर्ता यांनी दरम्यानच्या काळात द्वितीय अपील दाखल केलेले आहे. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत आयोगाचे निदर्शनास आणले की, दिनांक ४.६.१९५५ च्या राजपत्रान्वये जी अधिसूचना काढण्यात आली आहे त्या अधिसुचनाचे आधारे अपीलकर्त्याने मागणी केलेल्या जमीनीचा तपशील हया जमीनी वनविभागाच्या असल्यास दिसून येतात. त्या पृष्ठर्थ प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक १३.८.१९५५ चे राजपत्राची अधिसूचना आयोगासमोर दाखल केली.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेत्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ११.१०.२०१० चे पत्रान्वये ६ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची जमीन ही महसूल विभागाची आहे की वनविभागाची आहे ही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध झालेली दिसून येत नाही. तथापी आजच्या सुनावणीत दिनांक ४.६.१९५५चे राजपत्र आयोगासमोर दाखल करण्यात आले. त्या राजपत्राची अधिसूचने प्रमाणे ही जमीन वनविभागाची असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी व जनमाहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सांगितले. म्हणून सदरच्या अधिसूचनेची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक व योग्य होईल व सदरच्या अधिसूचनेची प्रत अपीलकर्त्यास देण्याबाबतची संमती जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दिली. म्हणून आजच्या सुनावणीत आयोगासमोर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.६.१९५५ ची अधिसूचनाची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली व त्या अधिसूचनेच्या प्रतीमुळे अपीलकर्त्याचे समाधान झाले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

... ४

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४९६/२०१०.

श्री. पुरुषोत्तम दशरथ चेडूके,
मु. पो. नवतळा, ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. आर. ननावरे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधिक्षक,
जि. चंद्रपूर.

श्री. एस. टी. पाटील,
जनमाहिती अधिकारी तथा
ठाणेदार,
पोलीस स्टेशन, भिसी,
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक १५.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.८.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन, भिसी, ता. चिमूर यांचेकडे पोलीस बंदोबस्तात घर पाडलेबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून

... २

अपीलकर्ता यांनी प्रथम अपील अपर पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे दिनांक १५.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर प्राप्त झालेल्या माहितीमुळे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी त्यांचेकडील दिनांक २.८.२०१० च्या माहिती अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार, पोलीस स्टेशन, भिसी यांना अपीलकर्त्याचे मकान पाडून टाकण्याबाबत दिनांक १२.५.२०१० रोजी कार्यवाही झालेली आहे ती पोलीस बंदोबस्तात झालेली कार्यवाही आहे म्हणून पोलीस बंदोबस्तासाठी दिनांक १२.५.२०१० रोजी कोणाचे आदेश दिलेले होते त्याची माहिती त्यांनी मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.९.२०१० रोजी अपर पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. सदरचे अपील दिनांक २३.९.२०१० रोजी प्राप्त झाले. अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त करुन घेतली व सदरची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यात आली. मात्र त्यानंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित असलेली माहिती प्राप्त झालेली नाही. अपीलकर्त्याने आजच्या सुनावणीत आयोगासमोर नमुद केले की, प्रामुख्याने अपीलकर्त्याचे म्हणणे असे दिसून आले की, दिनांक १२.५.२०१० रोजी पोलीस बंदोबस्तात त्यांचे घर पाडण्यात आले त्यावेळेस पोलीस बंदोबस्त कोणाच्या आदेशाने देण्यात आला होता त्याची माहिती त्यांना पाहिजे आहे असे आग्रही प्रतिपादन अपीलकर्त्याने सुनावणीत केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार, भिसी, तालुका चिमूर यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक २.८.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. त्या पृष्ठर्थ त्यांनी आयोगासमोर त्यांचे कार्यालयाचे आवक रजिस्टर अवलोकनार्थ सादर केले. सदरचे आवक रजिस्टरची पाहणी केली असता असे दिसून येते की, अपीलकर्त्याचा दिनांक २.८.२०१० चा माहिती अधिकाराचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला दिसून आलेला नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार, भिसी यांचेकडून अपीलकर्त्यास सदरची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधिक्षक यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दिनांक १५.९.२०१० चा अर्ज पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडून दिनांक २३.९.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अपील अर्जानुसार त्यांनी जनमाहिती अधिकारी तथा ठाणेदार यांचेकडून दिनांक २९.९.२०१० ला माहिती प्राप्त करुन घेतली व सदरची माहिती अपीलकर्त्यास दिनांक ७.१०.२०१० च्या पत्राने त्याचप्रमाणे ठाणेदार, पोलीस स्टेशन, भिसी यांचेकडून दिनांक २९.९.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती दिली आणि सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाल्याबद्यल त्यांनी आयोगासमोर पोच दाखविली. त्याला अनुसरुन सदरची माहिती अपीलकर्त्यास मिळाली असल्याचे कबूली त्यांनी आयोगासमोर दिली.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, प्रथम अपीलीय अधिकारी आणि जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.१०.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्त्यास या माहितीबाबत असे म्हणणे आहे की, त्यांचे मकान दिनांक १२.५.२०१० रोजी पोलीस बंदोबस्तात पाडलेले आहे तो पोलीस बंदोबस्त कोणाचा आदेशाप्रमाणे दिलेला आहे त्याची माहिती त्यांना मिळालेली नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, तहसीलदार, चिमूर यांचेकडील दिनांक ४.५.२०१० च्या पत्रान्वये दिनांक १०.५.२०१० ला पोलीस बंदोबस्त देण्यात आलेला होता. तसेच हा पोलीस बंदोबस्त देण्यासाठी पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचे दिनांक ७.५.२०१० चे पत्र देखील होते. म्हणून हा पोलीस बंदोबस्त दिनांक १०.५.२०१० रोजी देण्यात आला होता. तथापी त्या दिवशी ग्रामपंचायत, नवतळा यांचेकडून मकान पाडण्याची कार्यवाही होऊ शकती नाही. तथापी सदरची कार्यवाही दिनांक १२.५.२०१० रोजी करण्याचे ठरविले म्हणून दिनांक १२.५.२०१० रोजी पोलीस बंदोबस्त देण्यात आला. म्हणून अपीलकर्त्यास दिनांक १०.५.२०१० रोजी दिलेला पोलीस बंदोबस्त हा पुन्हा दिनांक १२.५.२०१० रोजी देण्यात आला असे कळविणे न्यायोचित व योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १०.५.२०१० रोजी देण्यात आलेला पोलीस बंदोबस्त त्या दिवशी कार्यवाही होऊ न शकल्यामुळे सदरचा पोलीस बंदोबस्त दिनांक १२.५.२०१० रोजी पुन्हा देण्यात आला असे अपीलकर्त्यास कळविण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १४१८/२०१०.

श्री. किशोर पत्रुजी तुरे,
सरस्वती विद्यालय मागे,
भिवापूर वार्ड, पो. बाबुपेठ, ता. जि. चंद्रपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक (माहिती) (वृत्त व जनसंपर्क)
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
रुम नं. ८, तळमजला, मंत्रालय, मुंबई - ३२.

श्री. अष्टपुत्रे,
जनमाहिती अधिकारी तथा
वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र),
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
रुम नं. ८, तळमजला, मंत्रालय, मुंबई - ३२. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.१२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.१०.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.११.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या सुनावणीच्या दिवशी दिनांक २३.११.२०१० रोजी अपीलकर्ता हे हजर झाले. मात्र उत्तरवादी यांनी सुनावणीची पुढील तारीख मिळण्यासाठी मुदत मागितली. मात्र प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याबाबत विनंती केली. म्हणून दिनांक २३.११.२०१० रोजी अपीलकर्ता यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले आणि उत्तरवादी यांचे म्हणणे मांडण्यासाठी १५.१२.२०१० तारीख दिली त्यानुसार आज दिनांक १५.१२.२०१० रोजी त्यांचे म्हणणे ऐकून घेण्यात आले.

... २

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांचेकडे डॉ. बाबासाहेब भिमराव रामजी आंबेडकर यांच्या जिवनावर आधारित जे काही शुटींग सीडीच्या स्वरुपात उपलब्ध असेल ते पुरविण्याबाबत एकूण ८ मुद्यांवर माहिती पुरविण्याबाबत विनंती केलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहायक संचालक (वृत्तचित्र) यांनी दिनांक २३.७.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास माहिती पुरविलेली असून चित्रीकरणाची एकत्रित किंमत रुपये २१,०००/- खर्च भरण्याबाबत कळविलेले दिसून येते. मात्र सदरच्या माहितीने अपीलकर्ता यांचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील संचालक (माहिती) (वृत्त जनसंपर्क) यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.९.२०१० रोजी दिलेला असून अपीलकर्त्याने शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. तथापी प्रथम अपीलाचा निर्णयाने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.७.२०१० च्या पत्राप्रमाणे रुपये २१०००/- शुल्क भरण्याबाबत जे पत्र दिले आहे ते शुल्क जादा आहे. सदर शुल्क ५०/- रुपयांपेक्षा जास्त असावयास नको असे त्यांनी नमुद केले. त्याचप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक १ ते ४ व ७ बाबत शुटींग उपलब्ध नाही असे लेखी कळविले आहे ते देखील चुकीचे आहे असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा वरिष्ठ सहायक संचालक यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्यास दिनांक २३.७.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्याच्या १ ते ८ मुद्याबाबत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यानुसार त्यांचे कार्यालयाचे अभिलेखाकडे अनुक्रमांक १ ते ४ व ७ या विषयांचे शुटींग उपलब्ध होत नाही असे नमुद केले असून अनुक्रमांक ५, ६ व ८ या मुद्यांचे चित्रीकरण महासंचालनालयात उपलब्ध आहे. सदरचे चित्रीकरण रुपांतरणाच्या कामासाठी लागणारी बीटा/मीनीडिव्ही कॅसेटमध्ये किंवा सीडीमध्ये रुपांतरण करण्याचा सरचार्जसह एकूण खर्च रुपये २१०००/- अपेक्षित आहे. सदरचा खर्च भरणा केल्यानंतर हे चित्रीकरण

अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यास कळविलेले आहे. मात्र अपीलकर्त्याने चित्रीकरणाचा खर्च रुपये २१०००/- चा भरणा केलेला नाही. म्हणून उपलब्ध चित्रीकरण अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आले नाही. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांचे कार्यालयाकडून चित्रीकरणाचे स्वरुपात सीडी किंवा कॅसेट या स्वरुपात चित्रीकरण उपलब्ध करुन देण्याचे स्वरुपात सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ६.१.१९९८ च्या शासन निर्णयाप्रमाणे स्टॉक शॉटस विक्रीचे दरपत्रक निश्चित करण्यात आलेले आहेत. त्या दरपत्रकानुसार किंमत आकारुन त्यांनी पुर्वी देखील काही व्यक्तिंना चित्रीकरण उपलब्ध करुन दिले आहे. त्याचा पुरावा म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर दिनांक १७.३.२००३ दिनांक १०.६.२००९ व दिनांक १५.१०.२००४ चे चित्रीकरण फी भरुन घेऊन चित्रीकरण दिल्याचे पत्र आयोगासमोर दाखविले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते त्याची सुनावणी घेण्यात आली. तथापी सुनावणीस अपीलकर्ता उपस्थित झाले नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी सादर केलेल्या माहितीवरुन प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला. त्या निर्णयामध्ये अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या माहिती बद्यलच्या शासनाने विहित केलेले शुल्क भरुन माहिती प्राप्त करुन घ्यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला आहे.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे १ ते ४ व ७ या मुद्यांची शुटींग उपलब्ध नाही असे अपीलकर्त्यास दिनांक २३.७.२०१० च्या पत्राने कळविले आहे. तसेच अनुक्रमांक ५, ६ व ८ या मुद्यांबाबतचे चित्रीकरण उपलब्ध असून त्याची एकूण फी रुपये २१०००/- भरण्याबाबत अपीलकर्त्यास दिनांक २३.७.२०१० च्या पत्राने कळविलेले दिसून येते. तसेच शासनाकडील सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील दिनांक ६.१.१९९८ चे पत्रात नमुद केलेले चित्रीकरणाच्या विक्रीचे दर अपीलकर्त्यास भरणे आवश्यक असलेले दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याने चित्रीकरणाचे शुल्क भरुन घेऊन उपलब्ध असलेले चित्रीकरण प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे चित्रीकरण शुल्क रुपये २१०००/- भरणा करावा व चित्रीकरणाचे शुल्क भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास अनुक्रमांक ५, ६ व ८ या मुद्यांचे चित्रीकरण त्वरित उपलब्ध करुन द्यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-　　दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०१/२०१०.**

श्री. धनपाल पंढरी मेश्राम,
मु. पो. नान्होरी, ता. ब्रम्हपूरी,
जि. चंद्रपूर - ४४१ २०६. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बी. टी. मापारी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, सावली,
जि. चंद्रपूर.

कु. आर. जी. पुरी,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, सावली,
जि. चंद्रपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १०.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, सावली यांचेकडे स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजने अंतर्गत स्थापन केलेल्या गटाची यादी तसेच त्यांना देण्यात आलेले खेळते

... २

भांडवल वाटप इत्यादी बाबत एकूण १४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.७.२०१० रोजी पत्राने १४ मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील खारीज केल्यामुळे अपीलकर्त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक ९.६.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्ज जनमाहिती अधिकारी, पंचायत समिती, सावली यांचेकडे दिला होता. त्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.७.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरची माहिती ही अपूर्ण स्वरुपात त्यांना प्राप्त झालेली असल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक ७.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २०.९.२०१०, १८.१०.२०१० व १८.११.२०१० रोजी घेण्यात आली. मात्र सदरच्या सुनावणी पैकी २ सुनावणीचे पत्र अपीलकर्त्यास मिळाले नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र दिनांक १८.११.२०१० चे सुनावणीचे पत्र त्यांना प्राप्त झाले. तथापी त्यांनी द्वितीय अपील राज्य माहिती आयोगाकडे दाखल केले असल्यामुळे ते प्रथम अपीलाचे सुनावणीस गेले नाही असे देखील अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. प्रथम अपील हे खारीज झाल्यामुळे त्यांना पूर्ण माहिती उपलब्ध झालेली नाही असेही त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.६.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्याकडे दिनांक १०.६.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जात आवश्यक असलेली माहिती पंचायत समितीमधील इतर विभागाकडून त्यांना माहिती संकलीत केली. सदरची माहिती दिनांक ७.७.२०१० रोजी त्यांचेकडे संकलीत झाली व त्याच दिवशी म्हणजे दिनांक ७.७.२०१० रोजी अपीलकर्त्याला १४ मुद्याची मुद्ये निहाय माहिती पोस्टाने पाठविली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याची कबूली अपीलकर्त्यांनी दिली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. याबाबत जनमाहिती अधिकारी

यांनी असे निवेदन केले की, त्यांच्या कार्यालयाकडे ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध होती ती माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यात आलेली आहे. स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजनेबाबत कोणताही शासन निर्णय त्यांच्या पंचायत समितीमध्ये उपलब्ध नाही. म्हणून सदरचा शासन निर्णय हा उपलब्ध नाही अशा प्रकारे अपीलकर्त्यास माहिती पुरविण्यात आली आहे.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दिनांक ७.८.२०१० चे दिनांक ११.८.२०१० ला प्राप्त झाले. प्रथम अपीलास अनुसरुन त्यांनी सुनावणी दिनांक २०.९.२०१०, १८.१०.२०१० व १८.११.२०१० रोजी ठेवण्यात आली होती. मात्र अपीलकर्ता सदरच्या सुनावणीस उपस्थित झाले नाही. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्यामुळे प्रथम अपील त्यांनी खारीज केले आहे.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांचा दिनांक ९.६.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्जप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ७.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविलेली दिसून येते. तसेच ज्या मुद्यांची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही तसे स्पष्टपणे त्या मुद्यांत नमुद केलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी पंचायत समितीच्या विभागाकडून माहिती संकलीत करावयाची असल्यामुळे माहिती पुरविण्यास थोडा विलंब झालेला दिसून येतो. मात्र संकलीत झालेली माहिती दिनांक ७.७.२०१० रोजी अपीलकर्त्यास त्याच दिवशी पुरविल्याचे स्पष्ट होते. जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ७.७.२०१० च्या पत्रान्वये जी माहिती पुरविली आहे त्या माहितीतील मुद्या क्रमांक ७ खेळते भांडवलाची यादी प्राप्त झाली नाही असे अपीलकर्त्याचे म्हणणे आहे. म्हणून खेळते भांडवलाची यादी अपीलकर्त्यास पुरविणे योग्य होईल. तसेच मुद्या क्रमांक ९ च्याबाबत दिनांक १६.७.२०१० च्या कार्यालयीन टिपणीची प्रत अपीलकर्त्यास मिळाली नाही म्हणून सदरच्या टिपणीची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१)  अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याला मुद्दा क्रमांक ७ मधील खेळत्या भांडवलाचेबाबत व मुद्दा क्रमांक ९ मधील दिनांक १६.७.२०१० ची कार्यालयीन टिपणीची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :-        दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०४/२०१०.**

श्री. अजय संभाजी खोत,
गांजा खेत, जुना भंडारा रोड,
हेडाऊ मोहल्ला, नागपूर. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. एस. कऱ्हाडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहाय्यक आयुक्त,
गांधीबाग झोन क्र. ६,
महानगरपालिका, नागपूर.

श्री. ए. बी. मोगरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
उपअभियंता लोककर्म,
गांधीबाग झोन क्र. ६,
महानगरपालिका, नागपूर. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २१.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २१.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, सतरंजीपूरा झोन, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली घर क्रमांक २००, वार्ड नं. ४५ जुने

मधील श्रीमती सुशिलाबाई गणपती मोहाडीकर, श्री. गिरधर गणपती मोहाडीकर, श्री. राजू गणपती मोहाडीकर यांच्या बांधकामाची मंजूर नकाशाची प्रत मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ३.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक ३.८.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखालील अर्जाप्रमाणे घर क्रमांक २००, वार्ड क्रमांक ४५ जूने यावरील श्रीमती सुशिलाबाई गणपती मोहाडीकर, श्री. गिरधर गणपती मोहाडीकर, श्री. राजू गणपती मोहाडीकर यांच्या सामाईक हिस्स्याची जी इमारत आहे त्या इमारतीच्या बांधकामाची मंजूर नकाशाची प्रत मागितलेली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३०.८.२०१० रोजी घराच्या मंजूर नकाशाचा क्रमांक व इमारत परवाना क्रमांक अर्जात नमुद न केल्यामुळे माहिती देता येत नाही म्हणून कळविले असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. प्रस्तुत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सहाय्यक आयुक्त, सतरंजीपुरा झोन, महानगरपालिका, नागपूर यांचेकडे दिनांक ३.९.२०१० रोजी दाखल केले. मात्र त्यानंतरही त्याना नकाशाची प्रत उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगासमोर असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ३.८.२०१० चा माहितीचा अर्ज सतरंजीपूरा झोन कडून दिनाक १७.८.२०१० रोजी प्राप्त झाला. मात्र माहितीच्या अर्जात घर क्रमांक व नकाशाचा क्रमांक इत्यादी नमूद नसल्यामुळे दिनांक ३०.८.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती देता येत नाही असे कळविले. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी सहाय्यक आयुक्त यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की, अपीलकर्त्याचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्या अर्जात अपीलास लागणारी माहिती नव्हती म्हणून सदरचा अर्ज हा माहितीचा अर्ज आहे असे समजून जनमाहिती अधिकारी यांना अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत कळविले. त्यानंतर

जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.१०.२०१० रोजी अपीलकर्त्यास पत्र देऊन असे कळविले की, श्रीमती सुशिलाबाई गणपती मोहाडीकर व इतर यांच्या घराबाबतची नकाशाची प्रत गैरअर्जदाराकडून मागितलेली आहे. मात्र अद्याप ती प्राप्त झालेली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २०.१०.२०१० रोजीच्या पत्राने कळविले होते.

४. मात्र आज आयोगासमोर सुनावणीचे वेळी जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, आता गैरअर्जदाराकडून म्हणजेच श्री. सुशिलाबाई गणपती मोहाडीकर व इतर यांचेकडून त्यांच्या घराबाबतच्या नकाशाची प्रत दिनांक ८.१२.२०१० रोजी प्राप्त झालेली आहे. सदरच्या नकाशाची प्रत आयोगासमोर अपीलकर्त्यास देण्याबाबत त्यांनी संमती दिली आणि सदरच्या नकाशाची प्रत सुनावणीचे वेळी आयोगासमोर अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात आली आणि ती प्रत अपीलकर्त्याने स्विकारलेली आहे. म्हणून अपीलकर्त्यास माहितीच्या अधिकाराखाली मागितलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३८७-१३८९/२१.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०६/२०१०.

श्रीमती शहनाज बेगम मो. याकुब,
घर नं. २१७, डॉ. शेख बुनकर कॉलोनी,
ता. कामठी, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी
जिल्हाधिकारी कार्यालय,
नागपूर.

श्री. फकीर मोहम्मद आरिफ,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
कामठी वेवर्स को-ऑपरेटीव्ह सोसायटी लि. कामठी,
गालीब रोड, इमरीबाग, ता. कामठी, जि.नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ती यांनी दिनांक २७.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, कामठी वेवर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन कामठी वेवर्स को-

... २

ऑपरेटिव्ह संस्थेतील घर क्रमांक २०६ हे अपीलकर्ती यांना वाटणीकरुन देखील महसूली रेकॉर्डप्रमाणे त्यांच्या नावावर न होण्याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक २१.८.२०१० रोजी जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. तथापी त्यानंतरही आवश्यक असलेली माहिती त्यांना मिळालेली दिसून येत नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी सुनावणीत असे नमुद केले की, कामठी वेवर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, कामठी या गृहनिर्माण सहकारी संस्थेला शासनाकडून जमीन मिळाली असून त्यावरती घर बांधण्यात आलेले आहे. त्यापैकी घर क्रमांक २०६ हे अपीलकर्ती यांना वाटणीकरुन दिलेले आहे. त्या घरावरील संपूर्ण कर्ज परतफेड केली असून अद्याप पर्यंत घर त्यांचे नावावर का होत नाही याबद्यल दिनांक १४.६.२०१० रोजीच्या अर्जाप्रमाणे माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना माहिती मिळालेली नाही. म्हणून त्यांनी शासकीय जमीन असल्यामुळे प्रथम अपील जिल्हाधिकारी, नागपूर यांचे कार्यालयास केल्याचे नमुद केले. तथापी प्रथम अपील नंतरही त्यांना माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे अपीलकर्ती यांनी सुनावणीत सांगितले.

४. आजच्या सुनावणीस कामठी वेवर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, कामठी यांचे तर्फे संस्थेचे अध्यक्ष फकीर अहमद आरिफ हे हजर होते. त्यांनी असे सांगितले की, संस्थेचे सचिव आणि अध्यक्ष देखील नविन असल्यामुळे या संस्थेचा संपूर्ण दप्तराची माहिती त्यांना नाही. म्हणून अपीलकर्तीला माहिती देता आली नाही. यावर अपीलकर्ती यांनी सुनावणीत असे नमुद केले की, संस्थेचे विद्यमान अध्यक्ष यांनी संस्थेचा रेकॉर्ड त्यांना निरिक्षणासाठी उपलब्ध करुन दिल्यास अपीलकर्तीस आवश्यक असलेली माहिती ते घेतील म्हणून संस्थेचे अध्यक्षांनी अपीलकर्तीला संस्थेचा रेकॉर्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा अशी विनंती अपीलकर्तीने आजच्या सुनावणीत केली.

५. अपीलकर्ती व संस्थेचे विद्यमान अध्यक्ष यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी दोघांच्या संमतीने असा निर्णय घेण्यात आला की, अपीलकर्ती यांनी दिनांक २८.१२.२०१० रोजी संस्थेच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे. त्यावेळी संस्थेचे अध्यक्ष यांनी अपीलकर्तीला संस्थेचा संपूर्ण रेकार्ड निरिक्षणासाठी उपलब्ध करुन द्यावा. अपीलकर्तीने निरिक्षण केल्यानंतर त्यांना पाहिजे असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती उपलब्ध करुन घेणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांनी दिनांक २८.१२.२०१० रोजी कार्यालयीन वेळेत कामठी वेवर्स को-ऑपरेटिव्ह सोसायटी, कामठी कार्यालयात हजर राहून संस्थेच्या रेकॉर्डचे निरिक्षण करुन घ्यावे व निरिक्षणानंतर त्यांना पाहिजे असलेली कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी प्राप्त करुन घ्याव्यात. त्यासाठी दिनांक २८.१२.२०१० रोजी संस्थेचे अध्यक्ष यांनी संस्थेच्या कार्यालयात स्वतः हजर राहावे व अपीलकर्तीस निरिक्षणासाठी रेकॉर्ड उपलब्ध करुन द्यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१३९०-१३९२/२२.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०७/२०१०.

श्री. धनराज शंकरराव सोनकुसरे,
पौनीकर मोहल्ला, दादरापुल रोड,
टिमकी, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रदीप डांगे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

श्री. के. डी. डेकापूरकर,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
संजय गांधी निराधार योजना,
महानगरपालिका क्षेत्र, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली दिनांक २५.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, महानगरपालिका क्षेत्र, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली सन २००० ते २००८ पर्यंतचे कुटुंब अर्थ सहाय्य योजना अंतर्गत, नागपूर

महानगरपालिका क्षेत्राचे प्राप्त झालेल्या अर्जाचे कार्यालयीन रजिस्टर नोंदवहीची झेरॉक्स प्रत. तसेच सन २००४ ते २००८ पर्यंत वाटप केलेले धनादेशाचे नोंद वहीची स्पष्ट झेरॉक्स प्रत मागणी केलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे दिनांक २.७.२००९ रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००९ रोजी दिलेला असून त्यानंतरही अपीलकर्त्याला आवश्यक माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.५.२००९ रोजी माहितीच्या अधिकाराखालील अर्ज जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, महानगरपालिका क्षेत्र यांचे कार्यालयाकडे सादर केला होता व सदरच्या क्षेत्रात महानगरपालिका नागपूर क्षेत्र २००० ते २००८ पर्यंतचे कुटुंब अर्थ सहाय्य योजना अंतर्गत प्राप्त झालेल्या संपूर्ण अर्जाचे कार्यालयीन रजिस्टर नोंद वहीची झेरॉक्स प्रती व सन २००४-२००८ पर्यंत वाटप केलेले धनादेशाचे विभागीय कार्यालयीन रजिस्टर नोंद वहीची सत्यप्रती मागितल्या होत्या. मात्र त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००९ रोजी देण्यात आला. त्या निर्णयाप्रमाणे देखील त्यांना माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, तत्कालीन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १८.६.२००९ चे पत्राने अपीलकर्त्यास माहिती अर्जाचे संदर्भात उत्तर पाठविले आहे. त्या उत्तरामध्ये असे नमुद केलेले आहे की, माहितीकरिता झेरॉक्स करण्याकरिता मोठया प्रमाणावर कार्यालयीन खर्च होणार आहे व या कार्यालयाकडे कार्यालयीन खर्च करण्याकरिता अल्प प्रमाणात वार्षिक निधी उपलब्ध होत असल्याने व सदरचा निधी हा कार्यालयीन खर्च अंतर्गत झेरॉक्स पेपर, संगणक देखभाल, स्टेशनरी, नोटीस, आदेशपत्र इत्यादी कामावर खर्च करावा लागत असल्यामुळे आपण सन २००० ते २००८ या कालावधीतील मागितलेली माहितीसाठी कार्यालयीन खर्च मोठया प्रमाणावर होणार असल्याने पुरविता येणे शक्य नाही. तथापी आपणास आवश्यक असलेले प्रकरणे व धनादेश संदर्भात आवश्यक निरिक्षण करुन फी नियमानुसार भरुन निरिक्षणा

करिता उपलब्ध करुन देण्यासाठी या कार्यालयाकडून सहकार्य करण्यात येईल असे तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविलेले आहे. असे विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांनी असे नमुद केले की, प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००९ रोजी देण्यात आलेला असून त्या निर्णयामध्ये असे नमुद केले आहे की, उत्तरवादी यांनी अपीलार्थीला आवश्यक ते शुल्क भरुन कार्यालयीन वेळेत नोंदवहया निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात याव्यात. परंतु अपीलार्थी यांनी नोंदवहयांच्या छायांप्रतींची मागणी केल्यास आवश्यक ते शुल्क जमा करुन अपीलार्थी यांना माहिती देण्यात यावी. अपीलार्थीला नोंदवहयांच्या छायाप्रती देण्याकरिता कार्यालयीन खर्चातून निधी वापरावा लागणार आहे. उत्तरवादी यांनी यासाठी लागणारा खर्च जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निधीची मागणी करावी. तसेच निधी प्राप्त झाल्यावर ३० दिवसांचे आत अपीलार्थीला माहिती देण्यात यावी. असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आलेला आहे असे विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. आजच्या सुनावणीत विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याने द्वितीय अपील आयोगाकडे ३० दिवसांचे मुदतीत दाखल केलेले नाही. त्यामुळे हे अपील मुदतबाहय झालेले आहे. तथापी यावर अपीलकर्त्याने असे नमुद केले की, प्रथम अपीलाचे निर्णयाप्रमाणे त्यांना माहिती मिळेल या अपेक्षेने त्यांनी माहिती मिळण्याची वाट पाहिली. तथापी प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून द्वितीय अपील दाखल करण्यास विलंब झालेला आहे. वास्तविक पाहता प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १८.७.२००९ रोजी झाल्यानंतरही जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहितीचे शुल्क कळविणे आवश्यक होते. मात्र ते शुल्क जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले नाही असे दिसून येते.

६. सुनावणी दरम्यान विद्यमान जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, संजय गांधी निराधार योजना, महानगरपालिका क्षेत्र, नागपूर यांनी आयोगासमोर असेही सांगितले की, त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक

... ४

२३.११.२०१० रोजी पत्र पाठवून प्रथम अपीलीय अधिकारी, नागपूर यांचे आदेशानुसार आपण मागितल्याप्रमाणे सन २००० ते २००८ पर्यतचे कुटुंब अर्थसहायचे संपूर्ण अर्जाचे झेरॉक्स प्रती तसेच सन २००४ ते २००८ पर्यंत वाटप केलेले धनादेशाचे विभागीय कार्यालयीनचे झेरॉक्स प्रती तयार करण्यात आल्या असून त्या घेण्यासाठी अपीलकर्त्यास त्यांनी दिनांक २४.११.२०१० रोजी कार्यालयात बोलाविले होते. मात्र अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात माहिती घेण्यासाठी गेले नाही. याबाबत अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, त्यांनी द्वितीय अपील दाखल केल्यामुळे ते जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहिती घेण्यासाठी गेलेले नाही.

७. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना पाहिजे असलेल्या माहितीची फी नेमकी किती होती याबद्यल जनमाहिती अधिकारी यांनी कळविलेले नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही फी भरण्याचे पत्र अपीलकर्त्यास पाठविल्याचे दिसून येत नाही. मात्र जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास सन २००० ते २००८ पर्यंतचे कुटुंब अर्थसहायचे प्रकरणाची सत्यप्रती द्यावयाची झाल्यास त्यासाठी कार्यालयीन खर्च मोठया प्रमाणावर होईल तसेच त्यासाठी आवश्यक तो निधी जनमाहिती अधिकारी यांचेकडे आज पर्यंत उपलब्ध नाही असे ही त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून याबाबत अपीलकर्त्याला विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २३.११.२०१० च्या पत्रात नमुद केलेल्या माहितीची झेरॉक्स प्रती तयार केलेल्या असून ते माहिती देण्याची तयारी अपीलकर्त्यास जनमाहिती अधिकारी यांनी दर्शविली आहे. म्हणून सदरची माहिती देण्यास विलंब झाल्याने जनमाहिती अधिकारी यांचेकडे तयार असलेली माहिती विनामुल्य अपीलकर्त्यास देणे संयुक्तिक होईल व त्या व्यतिरिक्त इतर कागदपत्राची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्याकडून आवश्यक त्या फीचा भरणा करुन घेऊन आणि त्यांच्या झेरॉक्स प्रतीचा खर्च करण्यासाठी त्यांचेकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्याने शासनाकडून पुरेसे अनुदान उपलब्ध करुन घेऊन बाकी माहिती उपलब्ध करुन घ्यावी. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येते.

... ५

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडील दिनांक २३.११.२०१० च्या पत्रानुसार अपीलकर्त्यास कळविल्याप्रमाणेची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. या माहिती व्यतिरिक्त इतर कागदपत्रांच्या प्रतीची योग्य ती फी भरुन घेऊन अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी. सदरच्या माहितीसाठी जनमाहिती अधिकारी यांचेकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्यास अनुदानाची मागणी शासनाकडे करावी व अनुदान प्राप्त झाल्यानंतर १५ दिवसांचे आंत ती माहिती अपीलकर्त्यास फी भरुन उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५०८/२०१०.

श्री. दुर्योधन दौलत शहारे,
मु. कोदामेडी, पो. ब्राम्हणी/सावंगी,
ता. सडक अर्जुनी, जि. गोंदिया. **..... अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. वाघाये,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, सडक/अर्जुनी,
जि. गोंदिया.

श्री. ए. एम. ऊईके,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, कोदामेडी,
ता. सडक/अर्जुनी, जि. गोंदिया. **..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २२.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २२.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २२.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत,

कोदामेडी यांचेकडे दिनांक २०.९.२००५ पासून आजपर्यंत कोदामेडी ग्रामपंचायतला किती शासकीय निधी प्राप्त झाला याबाबत एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.१०.२०१० ला माहिती मिळाली व त्यात त्यांचे पूर्णपणे समाधान झाले. यात माझी तक्रार राहणार नाही करीता मी लिहू देत आहे असे निवेदन सचिव, ग्रामपंचायत कोंदामेडी यांना लेखी लिहून दिले असून जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचे लेखी निवेदन आयोगाकडे सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१०/२०१०.

श्री. शितलदास कन्हैयालाल जावंधिया,
द्वारा - श्री. एम. एच. जावंधिया,
३५ जवाहर कॉलनी (लोअर), पुलगांव,
जि. वर्धा. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आझाद,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, वर्धा.

श्री. सुधीर फरसोले,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर अभियंता,
बांधकाम विभाग,
नगर परिषद, वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २३.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २३.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २३.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २३.६.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद, वर्धा यांचेकडे

... २

श्रीमती सुंदराबाई जावधिया यांनी त्यांचा प्लॉट नं. ११ व १२ मौजा पालकवाडी, खसरा नं. ३३/१(छ), ३४/२(घ) व ३५/१(क) हया भूखंडाचे नियमनामूल करण्यासाठी दिनांक २८.३.२००३ रोजी दिलेल्या अर्जाची सत्यप्रत व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्राची प्रत यासंबंधाने एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले आहे. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ५.७.२०१० रोजी पत्र पाठवून त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी एकूण ७ मुद्यांची माहिती मागितली आहे. त्या माहितीची मुळ नस्ती आपण बघून घ्यावी व संबंधित नस्तीत जी पत्र, कागदपत्रे उपलब्ध असतील ती प्राप्त करावी असे अपीलकर्त्यास दिनांक ५.७.२०१० रोजी कळविले होते. त्याला अनुसरुन अपीलकर्ता दिनांक ८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित झाले व त्यांनी संबंधित नस्तीचे निरिक्षण केले. त्या संबंधित नस्तीचे निरिक्षण केल्यानंतर अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती नस्तीत उपलब्ध नाही म्हणून माहिती देता येत नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक २९.७.२०१० च्या पत्राने कळविले. मात्र दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा यांचेकडे दिनांक ५.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २८.९.२०१० रोजी घेण्यात आली आणि प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २८.९.२०१० रोजी देण्यात येऊन त्यात असे नमुद केले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या दिनांक २३.६.२०१० चे माहिती अर्जाप्रमाणे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती जनमाहिती अधिकारी तथा नगर अभियंता, बांधकाम विभाग यांनी ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरविण्यात यावी असा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिला. त्या निर्णयास अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ६.१०.२०१० च्या पत्रान्वये अपीलकर्त्यास त्यांनी मागणी केलेली १ ते ७ मुद्याबाबत जावंधिया ले आऊटचे

बाबत उपलब्ध असणारी माहिती एकूण १ ते १९५ पाने विनामुल्य पुरविण्यात आली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. मात्र अपीलकर्ता यांनी माहिती अर्जात मागितलेली दिनांक २८.३.२००३ च्या श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांच्या उपरोक्त भुखंडाचे नियमानुकरण करुन देणे बाबतचा अर्ज व त्यासोबत असलेले इतर कागदपत्रे हे संबंधित नस्तीत उपलब्ध झाले नाही म्हणून ते कागदपत्रे अपीलकर्त्यास देता आली नाही. तथापी याबाबत असे दिसून येते की, श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांच्या उपरोक्त भुखंड हा मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा यांचेकडून दिनांक १.६.२००५ च्या आदेशाने या भुखंडाचे नियमानुकरण झाल्याचे आदेश पारित केले आहे. याचाच अर्थ असा की, श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांच्या दिनांक २८.३.२००३ च्या अर्जाला अनुसरुन हे नियमानुसार झालेले आहे. संबंधित नस्तीमध्ये नियमानुकरणाचा आदेश हा दिनांक १.६.२००५ चा आदेश आहे. मात्र श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांच्या दिनांक २८.३.२००३ च्या नियमानुकरण करण्याचा अर्ज उपलब्ध नाही. म्हणून सदरचा अर्ज का उपलब्ध झाला नाही याबाबत सखोल चौकशी करणे आवश्यक आहे. म्हणून मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा यांनी या भुखंडाचा नियमानुकरण आदेश काढण्याचे वेळी जे संबंधित कर्मचारी असतील त्यांची चौकशी करुन दिनांक २८.३.२००३ चा अर्ज उपलब्ध न होण्यास कोण जबाबदार आहे त्याबाबतची जबाबदारी निश्चित करुन त्या कर्मचाऱ्या विरुध्द अर्ज गहाळ केल्या प्रकरणी योग्य ती कार्यवाही करणे उचित होईल.

४. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक ५.८.२०१० रोजी दाखल झाले. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २८.९.२०१० रोजी घेण्यात आली व त्याच दिवशी निर्णय दिला की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाप्रमाणे जनमाहिती अधिकारी यांचेकडे जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती ७ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना विनामुल्य पुरविण्यात यावी.

५. जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना त्यांच्या कडील दिनांक ६.१०.२०१० च्या

पत्रान्वये १ ते ७ मुद्यांची माहिती १ ते १९५ पाने उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या दिनांक २३.६.२०१० च्या माहिती अर्जाप्रमाणे श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांचेकडील दिनांक २८.३.२००३ च्या त्यांच्या भूखंडाचे नियमानुकरण करणे बाबतचा अर्ज व त्यासोबतचे इतर कागदपत्रे मुळ नस्तीत दिसून येत नाही. मात्र श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांचे वरील भूखंडाचे नियमानुकरण करणेबाबतचा दिनांक १.६.२००५ चा आदेश उपलब्ध आहे. म्हणूनच दिनांक १.६.२००५ च्या नियमानुकरण आदेश ज्या कागदपत्राचे आधारे काढण्यात आले आहे ती कागदपत्रे आता त्या नस्तीत उपलब्ध होत नाही. म्हणून याबाबत मुख्याधिकारी यांनी त्यांच्या स्तरावर योग्य ती चौकशी करुन दिनांक २८.३.२००३ च्या अर्ज गहाळ झाल्या प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन त्यावर योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा आदेंश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांचेकडील दिनांक २८.३.२००३ च्या अर्जाची व त्यासोबतच्या कागदपत्राचा पुन्हा एकदा कसून शोध घ्यावा व सदरची कागदपत्रे उपलब्ध झाल्यास ती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

२) तथापी श्रीमती सुंदराबाई जावंधिया यांचा दिनांक २८.३.२००३ चा अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे उपलब्ध न झाल्यास ती कागदपत्रे गहाळ करण्यास कोण जबाबदार आहे त्याची चौकशी करुन त्याची जबाबदारी मुख्याधिकारी, नगर परिषद, वर्धा यांनी निश्चित करावी व जबाबदार असणाऱ्या कर्मचाऱ्यांविरुध्द योग्य ती कार्यवाही करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४००-१४०३/२३.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१४/२०१०.**

श्री. उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड नं. १७, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
धर्मदाय उपआयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर.

श्री. ए. जी. उमाठे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय,
नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली विद्या विहार शिक्षण संस्था, सावनेर, जि.

नागपूर नोंदणी क्रमांक एफ १११७८(नागपूर) या संस्थेच्या दिनांक १.८.२०१० पर्यंत अस्तित्वात असलेल्या कार्यकारीणीची (संचालक मंडळाची) माहिती परिशिष्ट अ प्रत मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील दाखल झाल्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, त्यांनी माहितीच्या अधिकाराखाली दिनांक ११.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांचेकडे विद्या विहार शिक्षण संस्था, सावनेर या संस्थेच्या संचालक मंडळाची माहिती मागितली होती तसेच परिशिष्ट अ ची प्रत मागितलेली होती. मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक १६.९.२०१० रोजी दाखल केले. त्यानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे त्यांनी सुनावणीत सांगितले. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असेही नमुद केले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना ३० दिवसात माहिती प्राप्त झाली नाही. म्हणून त्यांच्यावर शास्ती लावण्यात यावी. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील ३० दिवसांत प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करण्यात यावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

३. प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उपआयुक्त हे उपस्थित झालेले नाही. त्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेता आले नाही. तसेच त्यांनी लेखी खुलासा देखील सादर केलेला नाही. तथापी अपीलकर्त्याने प्रथम अपील दिनांक १६.९.२०१० रोजी दाखल केलेले दिसून येते. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) प्रमाणे ३० दिवसांचे आंत किंवा एकूण ४५ दिवसांत कारणे देऊन निकाली काढलेले दिसून येत नाही.

४. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, जनमाहिती अधिकारी यांनी अपीकर्त्यास त्यांचेकडील दिनांक ११.८.२०१० च्या माहिती अर्जातील माहिती दिनांक १५.११.२०१० रोजीच्या पत्राने उपलब्ध करुन दिली. मात्र त्यासोबत परिशिष्ट अ दिले नाही. सदरची दिलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे परिशिष्ट अ अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १५.११.२०१० च्या पत्राने म्हणजे सुमारे ३ महिने ४ दिवस इतक्या उशिराने माहिती उपलब्ध करुन दिली. माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विलंबाचे कारण जनमाहिती अधिकारी यांनी कार्यालयास रिक्त पदे असल्याचे नमुद केलेले आहे. मात्र माहितीचे स्वरुप पाहिले असता माहिती अत्यंत कमी प्रमाणात द्यावयाची होती. सदरची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसांचे मुदतीत देणे सहज शक्य होते. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिली असल्यामुळे विलंबाचे कारण संयुक्तिक दिसून येत नाही. म्हणून सदरच्या विलंबास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात.

५. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक १६.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केल्यानंतर त्यांनी देखील प्रथम अपीलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) नुसार ३० दिवसांत किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांत कारण देऊन निर्णय दिलेला दिसून येत नाही. या मुदतीत प्रथम अपीलाचा निर्णय कां देण्यात आला नाही यांचा कोणत्याही खुलासा त्यांनी सादर केलेला नाही. म्हणून भविष्यात अशा प्रकारच्या कार्यवाहीची पुनर्रावृत्ती होणार नाही याची ताकीद प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

६. अपीलकर्त्याला जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक १५.११.२०१० रोजी दिलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना परिशिष्ट अ ची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास सुमारे ३ महिने ४ दिवस उशिराने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरच्या विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रुपये १५०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दरमहाचे वेतनातून वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४०४-१४०७/२४.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१७/२०१०.

श्री. उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड नं. १७, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. पी. आर. पांडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे सावनेर नगर परिषद मधील सर्व विभागातील दिनांक १.१.२००५ ते ३०.८.२०१० पर्यंत पंजीकृत कंत्राटदारांची नांवे, त्यांचे दोन्ही लायसन्स क्रमांक, मुदत व कंत्राट घेण्याची मर्यादा याबाबत माहिती

... २

मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु त्या माहितीने समाधान झाले नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय मुदतीत मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांचेकडे दिनांक ३.९.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन सावनेर नगरपरिषद मधील सर्व विभागातील दिनांक १.१.२००५ ते ३०.८.२०१० पर्यंत पंजीकृत कंत्राटदारांची नांवे, त्यांचे दोन्ही लायसन्स क्रमांक, मुदत व कंत्राट घेण्याची मर्यादा याबाबत माहिती मागितली होती. त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून दिनांक २०.९.२०१० च्या पत्राने माहिती मिळाली. मात्र सदरची माहितीमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाचे लायसन्स क्रमांक आणि कामाची मर्यादा यांची माहिती मिळाली नाही. म्हणून त्यांनी मुख्याधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना मुदतीत मिळाला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्याचा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचेकडे दिनांक ३.९.२०१० ला प्राप्त झाला. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती काढण्यात आली आणि संपूर्ण माहिती दिनाक २०.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास दिली. मात्र अपीलकर्त्योने त्या माहितीबाबत असे नमुद केले की, सार्वजनिक बांधकाम विभागाची लायसन्स क्रमांक व काम करण्याची मर्यादा ही माहिती मिळाली नाही असे अपीलकर्तांनी सुंनावणीत सांगितले. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्त्यानी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लायसन्स क्रमांकाची माहितीच अर्जात मागितली नाही. म्हणून नगरपरिषदेकडे जमा केलेले पंजीयन शुल्काची माहिती दिली. तथापी अपीलकर्त्यास सार्वजनिक बांधकाम विभागाची लायसन्सची माहिती पाहिजे असल्यास जनमाहिती अधिकारी यांनी ती उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. तसेच कंत्राटदाराची काम करण्याची मर्यादाची माहिती दिलेली आहे. परंतु त्या मर्यादेपेक्षा ज्या कंत्राटदाराने जादाचे काम केलेले आहे त्या कंत्राटदाराची माहिती सुध्दा अपीलकर्त्यास पाहिजे आहे ती माहिती देखील उपलब्ध करुन देण्याची संमती जनमाहिती अधिकारी यांनी दिली.

... ३

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल झालेले होते. सदरचा प्रथम अपीलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) प्रमाणे ३० दिवसांत किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांचे आंत कारण देऊन दिलेला नाही. याबाबत त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांची शिक्षक मतदार संघाचे निवडणूकीसाठी खापरखेडा येथे नेमणूक झाली होती म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय मुदतीत घेता आला नाही.

६. अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक ३.९.२०१० च्या माहिती अधिकार अर्जाखालील माहिती जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक २०.९.२०१० च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदरच्या माहितीत सार्वजनिक बांधकाम विभागाचा लायसन्स क्रमांक व काम करण्याच्या मर्यादेपेक्षा जादा काम झाल्याची माहिती अपीलकर्त्यास पाहिजे आहे. म्हणून ती माहिती अपीलकर्त्यास विनामूल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना कंत्राटदाराचे सार्वजनिक बांधकाम विभागचे लायसन्स क्रमांक व काम करण्याचे मर्यादेपेक्षा जादा काम दिल्याची माहिती विनामुल्य व्यक्तिशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलबध करुन द्यावी.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) प्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांत कारणे लेखी नमुद करुन दिलेला दिसून येत नाही. म्हणून भविष्यात त्यांचेकडून अशा प्रकारची पुर्नावृत्ती होणार नाही याची त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१५/२०१०.**

श्री. उज्ज्वलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड नं. १७, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. अशोक चरपे,
जनमाहिती अधिकारी तथा
स्वास्थ निरिक्षक,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज देऊन दिनांक १.१.२००७ ते ३०.८.२०१० पर्यंत नगरपालिकेत उपलब्ध असलेल्या ट्रॅक्टरची संख्या किती, प्रत्येक ट्रॅक्टरचा परिवहन क्रमांक, ट्रॅक्टरची कामे,

... २

प्रत्येकी कोणत्या क्रमांकाच्या ट्रॅक्टरने किती किलोमीटर चालला त्यावर आलेला डिझेल व इतर खर्चाचा तपशिलाची माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. प्रथम अपीलाचा निर्णय मुदतीत मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी नगर परिषद, सावनेर यांचेकडे त्यांनी दिनांक ३.९.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली दिनांक १.१.२००७ ते ३०.८.२०१० पर्यंत नगरपालिकेत उपलब्ध असलेल्या ट्रॅक्टरची संख्या किती, प्रत्येक ट्रॅक्टरचा परिवहन क्रमांक, ट्रॅक्टरची कामे, प्रत्येकी कोणत्या क्रमांकाच्या ट्रॅक्टरने किती किलोमीटर चालला त्यावर आलेला डिझेल व इतर खर्चाचा तपशिलाची माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.९.२०१० रोजी अपीलकर्त्यास एकूण रुपये १२१२/- माहितीची फी भरण्याबाबत कळविले. परंतु अपीलकर्त्याला फी भरण्याची आवश्यकता नाही. कारण त्यांना संख्येच्या स्वरुपात माहिती पाहिजे होती असे त्यांनी नमुद केले. म्हणून त्यांनी फी भरली नाही असेही त्यांनी सुनावणीत सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा दिनांक ३.९.२०१० रोजीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला. त्या अर्जातील माहितीचेनुसार संपूर्ण माहिती काढण्यात आली आणि त्या माहितीची फी रुपये १२१२/- भरण्याबाबत दिनांक १८.९.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविले. त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, कोणते वाहन किती किंलोमीटर चालले आहे, त्यावर किती खर्च आहे , कोणती कामे केली आहे यांचा संपूर्ण तपशील लॉगबुकमध्ये असतो व सदर लॉगबुक दिनांक १.१.२००७ ते दिनांक ३०.८.२०१० पर्यंत संपूर्ण झेरॉक्स खर्च ६०६ प्रती आहेत. त्यापेजचे रुपये २/- प्रमाणे फी ही रुपये १२१२/- होते. कारण माहितीच्या अधिकाराखाली कार्यालयात ज्या स्वरुपात माहिती उपलब्ध आहे त्या स्वरुपात माहिती देणे अपेक्षित आहे. म्हणून अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही लॉगबुकच्या स्वरुपात देणे शक्य आहे असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल झालेले होते. मात्र सदरच्या अपीलाचा निर्णय ३० दिवसांचे आंत देता आला नाही. त्याचे कारण त्यांनी असे नमुद केले की, शिक्षक मतदार संघासाठी त्यांची केंद्राध्यक्ष म्हणून त्यांची नेमणूक झाली होती. म्हणून प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना ३० दिवसांत घेता येणे शक्य झाले नाही. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीच्या अधिकाराखालील प्रथम अपीलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) प्रमाणे ३० दिवसांचे आंत किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांचे आंत कारणे नमुद करुन घेणे आवश्यक होते. मात्र तशी कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी यांनी केलेली नाही. म्हणून भविष्यात त्याची पुनर्रावृत्ती होणार नाही याची सक्त ताकीद प्रथम अपीलीय अधिकारी यांना देण्यात येत आहे.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही लॉगबुकच्या स्वरुपात उपलब्ध आहे व लॉकबुकमध्ये वाहनाबाबत संपूर्ण तपशील उपलब्ध असतो. त्यासाठी लॉगबुकच्या झेरॉक्स प्रती अपीलकर्त्याने योग्य ती फी भरुन घेणे संयुक्तिक आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक १८.९.२०१० रोजी अपीलकर्त्यास माहितीची फी रुपये १२१२/- भरणा करण्याबाबत कळविले आहे ते योग्य दिसून येते. सदरची फी अपीलकर्त्याने नगरपरिषदमध्ये भरणा करुन लॉकबुकच्या स्वरुपात माहिती उपलब्ध करुन घेणे उचित दिसून येते. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहितीची फी रुपये १२१२/- भरावी व सदरची फी भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(६) प्रमाणे ३० दिवसांचे मुदतीत किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांत कारणे लेखी नमुद करुन दिलेला दिसून येत नाही. म्हणून भविष्यात त्यांचेकडून अशा प्रकारची पुर्नावृत्ती होणार नाही याची त्यांना ताकीद देण्यात येत आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५१६/२०१०.

श्री. उज्जवलकुमार वासुदेवराव बागडे,
वार्ड नं. १७, ता. सावनेर, जि. नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. विनोद जाधव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर.

श्री. अशोक चरपे,
जनमाहिती अधिकारी तथा
स्वास्थ निरिक्षक,
नगर परिषद, सावनेर, जि. नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २४.१२.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१०.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २४.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २४.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांचेकडे माहिती अधिकाराखाली अर्ज करुन सावनेर नगर परिषदद्वारे नवीन खरेदी केलेल्या वाहनांची माहिती (२००७ ते २०१० पर्यंत) तसेच खरेदी किंमत, खरेदी तारीख, आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन क्रमांक,

... २

इंश्युरन्सची माहिती सह) माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्त्याने प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्त्याने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांनी दिनांक १०.८.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा नगरपरिषद, सावनेर यांचेकडे (२००७ ते २०१० पर्यंत) सावनेर नगर परिषदेद्वारे नवीन खरेदी केलेल्या वाहनांची माहिती त्याची खरेदीची किंमत, खरेदी तारीख, आर.टी.ओ. रजिस्ट्रेशन क्रमांक, इंश्युरन्सची माहिती सह) माहिती मागितलेली होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १२.८.२०१० रोजी पत्र देऊन असे कळविले की, वाहन खरेदी फाईल न्यायालयीन प्रकरणात कोर्टात सादर केलेली असल्यामुळे फाईल कोर्टाकडून प्राप्त झाल्यानंतर माहिती पुरविण्यात येईल. त्यानंतर दिनांक १८.९.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती फी प्रती दस्तऐवज रुपये २/- प्रमाणे भरणेबाबत कळविले. वास्तविक पाहता जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती ३० दिवसांत उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. त्यामुळे माहितीला उशिर झाला म्हणून विनामुल्य माहिती त्यांना दिली पाहिजे आणि उशिर झाल्याबद्यल जनमाहिती अधिकारी यांचेवर कार्यवाही केली पाहिजे असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी वाहनाची माहिती मागितलेली होती. सदरची फाईल न्यायालयाचे कामाकरिता नगरपरिषदेच्या वकीलाकडे देण्यात आली होती. त्यामुळे ३० दिवसांचे मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. वकीलाकडून सदरची फाईल प्राप्त झाल्यानंतर अपीलकर्त्यास दिनांक १८.९.२०१० च्या पत्राने माहितीच्या दस्तऐवजांच्या छायांकित प्रती रुपये २/- प्रमाणे फी भरण्याबाबत कळविले होते. मात्र अपीलकर्त्यानी फीचा भरणा केलेला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

५.	प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक २७.९.२०१० रोजी दाखल झाले होते. सदरचा अपीलाचा निर्णय ३० दिवसात त्यांना घेता आला नाही. त्याचे कारण त्यांनी असे नमुद केले की, त्यांची शिक्षक मतदार संघात केंद्राध्यक्ष म्हणून नेमणूक झाली होती. त्यामुळे ते निवडणूक कामात व्यस्त होते.

६.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसूंन येते की, अपीलकर्ता यांनी दिनांक १०.८.२०१० च्या माहिती अधिकाराखाली अर्जाप्रमाणे वाहनाबाबतची माहिती मागितलेली होती. वाहनाबाबतची फाईल नगरपरिषदेच्या वकीलाकडे न्यायालयीन कामासाठी दिली होती. म्हणून वाहनाची माहिती मुदतीत देता येण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांनी वकीलाकडून ती फाईल ३० दिवसांत प्राप्त करुन घेऊन अपीलकर्त्यास माहिती देणे आवश्यक होते. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी फाईल केवळ वकीलाकडे आहे म्हणून माहिती देता येत नाही असे म्हणून माहिती देता येत नाही असे म्हणणे योग्य व संयुक्तिक नाही. याबाबत जनमाहिती अधिकाऱ्यांचा खुलासा मान्य करता येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी योग्य ती खबरदारी घेतलेली दिसून येत नाही. परिणामी अपीलकर्त्यास माहिती देण्यास विलंब झाल्याबाबत जनमाहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी देखील प्रथम अपीलाचा निर्णय ३० दिवसांचे मुदतीत किंवा जास्तीत जास्त ४५ दिवसांचे मुदतीत कारणे नमुद करुन नियमाप्रमाणे निर्णय घेणे आवश्यक होते. म्हणून भविष्यात त्यांचेकडून त्याची पुनर्रावृत्ती होणार नाही याची सक्त ताकीद त्यांना देण्यात येत आहे. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.८.२०१० च्या माहितीच्या अधिकाराखालील अर्जाची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने किंवा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ३० दिवसाचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून झालेल्या विलंबाबद्यल कोणतेही संयुक्तिक कारण दिसून येत नाही म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी याबाबत केलेला खुलासा मान्य करता येत नाही. म्हणून जनमाहिती अधिकारी यांच्या विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) प्रमाणे रुपये १००००/- शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली मुख्याधिकारी, नगर परिषद, सावनेर यांनी दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष " ००७० - इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४१५-१४१८/२४.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५२२/२०१०.

श्री. सुरेंद्र नामदेवराव ठाकरे,
बी/४/बी-१३, डब्ल्यू.सी.एल. टाऊनशिप टेकाडी,
टेकाडी बसस्टॉप जवळ, एन.एच.नं. ७,
पो. गोंडेगांव, ता. पारशिवनी, जि. नागपूर - ४४१ ४०४. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अविनाश कातडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
वर्धा.

श्री. एच. एम. लोखंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
वर्धा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक २३.६.२०१० रोजी माहितीचा अधिकाराखालील अर्जान्वये जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, वर्धा यांचे कार्यालयाकडे मौजा उमरी (मेघे), ता.जि. वर्धा येथील शेत

... २

सर्व्हे नं. २२५/२ क, २२६/२ क तसेच २२५/२ व २२६/२ ख चे तहसीलदार, वर्धा यांचेकडील रे.के.नं. एन.ए.पी.३४/३७/२९८७-८८ (एनएपी-३४/२७/१९८७-८८) ऑर्डर दिनांक १६.२.१९८९ व एनएपी/३४/५३/ १९८७-८८, दिनांक ५.४.१९८९ नुसार करण्यात आलेल्या अकृषक प्रस्तावाबाबतची संपूर्ण प्रक्रिया केलेल्या कागदपत्राची माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्यामुळे त्यांनी उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षेप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार, वर्धा यांचेकडे त्यांनी दिनांक २३.६.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन वर नमुद केलेल्या शेत सर्व्हे नं. बाबत अकृषक प्रस्तावाची माहिती आणि त्यासोबत जोडलेले इतर कागदपत्रांच्या प्रती त्यांनी मागणी केली होती. मात्र त्यांना माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडून दिनांक १४.७.२०१० च्या पत्राने सदरचा प्रस्ताव त्यांचे अभिलेखागारात आढळून येत नाही त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे त्यांना कळविले. म्हणून त्यानंतर अपीलकर्त्याने उपविभागीय अधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिनांक २०.८.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २४.९.२०१० रोजी देण्यात आला. त्यानिर्णयानंतर देखील अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्याने आजच्या सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांनी सुनावणीत असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांचेकडे दिनांक २३.६.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.७.२०१० च्या पत्राने अपीलकर्त्यास उत्तर पाठविले. सदरच्या उत्तरात असे नमुद करण्यात आले की, अपीलकर्ताने मागितलेली मौजा उमरी(मेघे), ता.जि. वर्धा कक्षेतील शेत सर्व्हे नं. २२५/२ क, २२६ क तसेच २२५/२ व २२७ ख चे या शेत सर्व्हे नंबरचे अकृषक दस्तऐवज अभिलेखागारात शोध घेतला असता सदरचे दस्तऐवज त्यांचे अभिलेखागारात जमा झालेले नाही. म्हणून अकृषक बाबतच्या प्रक्रियेची कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नाही.

५.	प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दाखल झाले होते. सदरच्या प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २४.९.२०१० ला घेण्यात आली. सुनावणीत संबंधितांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर सदरच्या प्रकरणाचा पुनश्चः एकदा शोध घेऊन १५ दिवसांत सुधारित माहिती अपीलकर्त्याला जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिला. या निर्णयाला अनुसरुन पुनश्चः त्यांचे अभिलेखागारात शोध घेतला. शोध घेतल्यानंतर सदरचे प्रकरण पुन्हा आढळून आले नाही म्हणून त्यांनी अपीलकर्त्यास दिनांक ४.१२.२०१० रोजी अपीलकर्त्यास असे कळविले की, सदरच्या प्रकरणाची कार्यालयातील रेकॉर्डमध्ये नोंदच नाही. त्यामुळे सदर प्रकरण बनावटी/बोगस असल्याचे दिसून येते. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही.

६.	अपीलकर्ता यांनी प्रामुख्याने असे सांगितले की, त्यांनी माहिती अधिकाराखाली ३ मुद्यांची माहिती मागितलेली होती. परंतु त्यापैकी जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ४.१२.२०१० च्या पत्राने एकाच मुद्यांची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्रमांक २ अकृषक करण्याकरिता असल्या नियमांची माहिती त्यांना पाहिजे होती. तसेच नियमाने नकाशा मंजूर नसतांना ले आऊट मालकाने मुदतीनंतर ले आऊट विकल्याचे वैधतेबद्यल माहिती मागितलेली होती. या मुद्याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, शेत जमीनीला अकृषक परवानगी देतांना त्यामध्ये शर्ती व अटी नमुद केलेल्या असतात. त्या शर्ती व अटी शिवाय त्यांचे कार्यालयाकडे आणखी कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाही. तथापी अकृषक प्रस्तावाबाबत शासनाचे किंवा इतर विभागाचे वेळोवेळी परिपत्रके त्यांचे कार्यालयीन धारिकेत उपलब्ध आहेत. अपीलकर्ताने नियमाप्रमाणे फी भरल्यास ती कागदपत्रे अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची संमती प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिली.

७.	अपीलकर्ता तसेच जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, प्रस्तुत प्रकरणी अपीलकर्त्याने अकृषक प्रस्तावाची मागितलेली कागदपत्रे बनावट/बोगस असल्याचे दिसून येते. त्यामुळे ते कागदपत्रे उपलब्ध करुन देता येत नाही. यासाठी अपीलकर्त्याने योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्ता यांनी अकृषक प्रस्तावाबाबत उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे कार्यालयाकडे उपलब्ध असलेल्या धारिकेतील कागदपत्राचे निरिक्षण करुन

घेऊन त्याची नियमाप्रमाणे फी भरुन घेऊन कागदपत्रे उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. तसेच अकृषक प्रस्तावाला मंजूरी देतांना ज्या शर्ती व अटी मंजूर केलेल्या आहेत त्याची प्रत उपविभागीय अधिकारी यांचेकडून उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशत: मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, वर्धा यांनी अपीलकर्त्यास त्यांचे कार्यालयातील अकृषक प्रस्तावाबाबतचे धारिकाचे निरिक्षण करु द्यावे. निरिक्षणानंतर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली कागदपत्राची फी भरुन घेऊन ती कागदपत्रे उपविभागीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन द्यावी.

२) उपविभागीय अधिकारी यांनी अकृषक प्रस्तावाला मंजूरी देतांना ज्या शर्ती व अटी असतात त्याची प्रती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.

३) सदरची कागदपत्रे उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचेकडून प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही अपीलकर्ता यांनी करावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४१९-१४२२/२८.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५२१/२०१०.

श्री. निलकंठ जैराम कुंभरे,
सावरटोला, ता. अर्जुनी (मोर),
जि. गोंदिया. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आर. जी. शक्करवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
अर्जुनी (मोर), जि. गोंदिया.

श्री. एस. के. यादव,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
अर्जुनी (मोर) जि. गोंदिया. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक २.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.९.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, अर्जुनी (मोर), जि. गोंदिया यांचेकडे श्री. शिवदास शिवराम बारापात्रे हा शिवदास जैराम

कुंभरे असे खोटे नाव लिहितो व त्यानी शासनाकडून मिळणारी अनुदानाची रक्कम (४४००/-) अपीलकर्त्याचे संमती विना स्वतःकडे लाटण्यासाठी खोटा हलपनामा (प्रतिज्ञापत्र) सादर केलेला आहे. म्हणून श्री. बारापात्रे यांचेवर भा.दं.वि.चे कलम १९९, २०० व १९३(३) ची कारवाई करण्याच्या मागणीचे संदर्भात केलेल्या कार्यवाहीबाबत माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ताने प्रथम अपील तहसीलदार, अर्जुनी (मोर) यांचेकडे दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही अपेक्षित माहिती अपीलकर्त्यास मिळाली नाही. त्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, शासनाकडून अनुदान रक्कम मिळण्यासाठी श्री. शिवदास शिवराम बारापात्रे यांनी खोटे शपथपत्र दाखल करुन माझी संमती न घेता शासन अनुदान रक्कम रुपये ४४००/- घेतली आहे. सदरच्या शपथपत्रामध्ये माझी संमती न घेता खोटे दर्शविले आहे व असे खोटे दर्शवून रुपये ४४००/- शासन अनुदान रक्कम घेण्याचा प्रयत्नात आहेत. म्हणून श्री. शिवदास शिवराम बारापात्रे यांनी खोटे शपथपत्र दाखल केले असल्यामुळे त्यांचेवर कार्यवाही व्हावी असा नायब तहसीलदार, अर्जुनी (मोर) यांचेकडे अर्ज केला होता. मात्र जनमाहिती अधिकारी यांचेकडून त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी तहसीलदार, अर्जुनी(मोर) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक ११.९.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्रस्तुतकार-२ श्री. सी. बी. दियेवार यांनी दिनांक १३.१०.२०१० रोजी सादर केला. सदरच्या अर्जावर माहिती पुरविण्यासाठी त्यांनी प्रस्तुतकार-२ श्री. सी. बी. दियेवार, यांना दिनांक १३.१०.२०१० रोजी पत्र देऊन अपीलकर्त्याने मागितलेली माहिती पुरविण्यात यावी असे कळविले. जेणेकरुन अपीलकर्त्यास ती माहिती पुरविता येईल. तथापी श्री. सी. बी. दियेवार, प्रस्तुतकार यांचेकडून माहिती प्राप्त

झाली नाही. दरम्यानच्या काळात अपीलकर्ता यांनी तहसीलदार यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर अपीलकर्ता यांना दिनांक १६.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१०.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी दिनांक ३०.११.२०१० रोजी घेण्यात आली आणि दिनांक ३०.११.२०१० ला आदेश पारित केले. सदरच्या आदेशात जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ७ दिवसांचे आंत माहिती पुरवावी असे आदेशित केले. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.१२.२०१० च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना शपथपत्राचे संदर्भात दिनांक १६.१२.२०१० रोजीची माहिती दिलेली आहे. त्या माहितीबाबत त्यांचे समाधान झालेले दिसून येत नाही. त्यांचे म्हणणे असे आहे की, श्री. शिवदास शिवराम बारापात्रे यांनी खोटे शपथपत्र दाखल केले असल्यामुळे त्यांचेवर काय कार्यवाही केली आहे त्याची माहिती त्यांना पाहिजे आहे. म्हणून खोटे शपथपत्राचे संदर्भात काय कार्यवाही करण्यात आलेली आहे याची माहिती जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खोटे शपथपत्र सादर केलेल्या प्रकरणी केलेली कार्यवाहीची माहिती रजिस्टर पोस्टाने विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्त्याचा दिनांक ११.९.२०१० चा माहितीचा अर्ज जनमाहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार यांचेकडे दिनांक १३.१०.२०१० रोजी प्रस्तुतकार-२ श्री. सी. बी. दियेवार यांनी उशिराने सादर केलेला आहे. हा अर्ज उशिराने का सादर केला याचा कोणताही संयुक्तिक खुलासा श्री. सी. बी. दियेवार यांनी आयोगाकडे सादर केलेला नाही. म्हणून माहिती अधिकाराखालील अर्जावर ३० दिवसांचे आंत कार्यवाही झालेली दिसून येत नाही. या विलंबास जनमाहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे श्री. सी. बी. दियेवार, प्रस्तुतकार-२, हे जबाबदार दिसून येतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) अन्वये त्यांना जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यात येत असून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) प्रमाणे त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही सक्षम अधिकाऱ्यांनी करावयाची आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४२३-१४२६/२८.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५२४/२०१०.**

श्री. मुश्ताक अहमद व. अब्दूल जब्बार,
मोमीनपूरा पोलीस चौकी जवळ,
नागपूर - ४४० ०१८. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. सी. सुर्यवंशी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भुमी अभिलेख कार्यालय, नागपूर.

श्री. पी. टी. भूते,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रमुख लिपिक,
अधिक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.६.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधिक्षक, भूमी अभिलेख, नागपूर यांचेकडे दिनांक १.३.२००५ ते १४.६.२०१०

... २

पर्यंत आपले कार्यालयात किती प्रकरणे क्षेत्र दुरुस्ती संबंधी दाखल झाले. तसेच आपले कार्यालयाकडून हद्द बदलून किती प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती करण्यात आली याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दिनांक ६.९.२०१० रोजी दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपील दाखल झाल्यानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा प्रमुख लिपिक, अधिक्षक, भूमी अभिलेख कार्यालय, नागपूर यांचेकडे दिनांक १४.६.२०१० रोजी माहितीच्या अधिकाराखाली माहिती मिळण्यासाठी अर्ज केला होता. सदरच्या अर्जात त्यांनी वर नमुद केल्याप्रमाणे माहिती मागितलेली होती. त्या अर्जाला अनुसरुन जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक ७.७.२०१० रोजी फी भरण्याबाबतचे पत्र पाठविले. त्या पत्राला अनुसरुन अपीलकर्त्यांनी दिनांक १४.७.२०१० चे पत्राने जनमाहिती अधिकारी यांना फी भरण्यास तयार असले बाबत पत्र पाठविले व किती फीचा भरणा करावा म्हणून विचारणा केली. त्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी दिनांक ३१.७.२०१० रोजी अपीलकर्त्यास पत्र पाठवून झेरॉक्स प्रतीची फीचे रुपये ३८४/- भरणा करण्याबाबत अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक २०.८.२०१० रोजी फीचा भरणा केला. मात्र फीचा भरणा केल्यानंतरही अपीलकर्त्यास किती प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती झाले आणि किती प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती झाली नाही याची वेगवेगळी माहिती पाहिजे होती. मात्र वेगवेगळी माहिती नसल्यामुळे अपीलकर्त्याने ती माहिती घेतली नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणीची नोटीस किंवा प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना अद्याप मिळालेला नाही. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे असे नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयात दिनांक १४.६.२०१० रोजी प्राप्त झाला. त्या अर्जाला अनुसरुन दिनांक ७.७.२०१० रोजी पत्र पाठवून फीचा भरणा करण्याबाबत कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याचे मागणीनुसार दिनांक ३१.७.२०१० च्या

पत्राप्रमाणे माहितीच्या झेरॉक्स प्रतीसाठी रुपये ३८४/- चा भरणा करावा म्हणून कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने दिनांक २०.८.२०१० रोजी फीचा भरणा केला. अपीलकर्त्याने फीचा भरणा केल्यानंतर कार्यालयात तयार असलेली माहिती उपलब्ध करुन दिली पण त्यांनी ती स्विकारलेली नाही. याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की त्यांचे कार्यालयामध्ये क्षेत्र दुरुस्ती येणाऱ्या प्रकरणाची नोंद एकाच नोंदवहीमध्ये घेण्यात येते. त्यापैकी ज्या क्षेत्राची दुरुस्ती करण्यात येते त्याबाबत त्या नोंदवहीत त्या प्रस्तावावर गोलराऊंड असे चिन्ह करण्यात येते. म्हणून त्यांच्या कार्यालयात क्षेत्र दुरुस्ती झालेल्या प्रकरणात व क्षेत्र दुरुस्ती न झालेल्या प्रकरणात एकच नोंदवही आहे. त्यामुळे त्या नोंदवहीची झेरॉक्स प्रत ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती कागदपत्रे देण्याची तरतुद कायद्यात आहे. म्हणून कार्यालयात ज्या स्वरुपात ती कागदपत्रे आहेत त्या स्वरुपात ती कागदपत्रे देण्याची संमती जनमाहिती अधिकारी यांनी दिली.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, त्यांचेकडे अपीलकर्ता यांचा अपील अर्ज उपसंचालक, भूमी अभिलेख, नागपूर यांचे कार्यालयाकडून दिनांक १६.९.२०१० रोजी प्राप्त झाला. त्याप्रमाणे अपीलाची सुनावणी दिनांक २१.१०.२०१० रोजी ठेवली. त्या सुनावणीची नोटीस अपीलकर्त्यास दिनांक ६.१०.२०१० रोजी साध्या पोस्टाने पाठविली. मात्र सदरच्या सुनावणीचे पत्र अपीलकर्त्यास मिळाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीचे पत्र साध्या पोस्टाने पाठविल्याबाबतचा पुरावा म्हणजे जावक रजिस्टर नोंदवही दाखविली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.११.२०१० रोजी दिला. त्यामध्ये असे नमुद केले की, अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जानुसार जनमाहिती अधिकारी यांचेकडून फी भरल्यामुळे माहिती प्राप्त करुन घ्यावी.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे क्षेत्र दुरुस्तीसाठी प्राप्त झालेल्या प्रकरणाची माहिती व त्यापैकी किती प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती झाली व किंती प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती झाली नाही याची माहिती वेगवेगळी पाहिजे होती. तथापी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात क्षेत्र दुरुस्ती

साठी येणाऱ्या प्रकरणाची एकच नोंदवही असून त्या नोंदवहीत सर्व प्रकरणाची नोंद घेण्यात येते. त्यापैकी ज्या प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती केली जाते त्या प्रकरणात नोंद वहीवर गोलराऊंड करण्यात येतो व ज्या प्रकरणात गोल राऊंड झाला नसते त्यावर क्षेत्र दुरुस्ती कार्यवाही प्रलंबित असते. म्हणून दोन नोंदवहया यासाठी कार्यालयात उपलब्ध नाही. ही वस्तुस्थिती लक्षात घेता जनमाहिती अधिकारी यांनी त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या नोंद वहीची झेरॉक्स प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी व त्याबाबत त्यांचे कार्यालयाकडे एकच नोंदवही असून ज्या प्रकरणात क्षेत्र दुरुस्ती झाली आहे त्यावर गोलराऊंड केलेले आहे व ज्या प्रकरणात गोलराऊंड केले नाही ते प्रकरण प्रलंबित आहे असे स्पष्टपणे स्वतंत्र पत्र देऊन कळविणे संयुक्तिक होईल. तसेच झेरॉक्स स्वरुपात अपीलकर्त्यास जी कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यात येत आहेत ती माहितीच्या अधिकारानुसार उपलब्ध करुन देत असल्याबद्यल प्रमाणपत्र स्पष्टपणे नमुद करणे योग्य होईल म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे स्वतंत्र पत्र झेरॉक्स प्रती सोबत देऊन त्या पत्रामध्ये त्यांचे कार्यालयाकडे एकच नोंदवही असल्याबद्यल स्पष्ट उल्लेख करावा. तसेच अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येणाऱ्या झेरॉक्स प्रती त्यांच्या माहिती अर्जानुसार उपलब्ध करुन देण्याबाबत प्रमाणपत्र देण्यात यावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५२३/२०१०.**

श्री. रामप्रसाद गंभिराजी बोरकर,
प्लॉट नं. २७, मारोती हाऊसिंग सोसायटी,
भगतनगर, भरतवाडा रोड, नागपूर. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती एस. जी. पतंगे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक १.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज करुन एकूण १ ते ३ मुद्यांवर

... २

शिपाई वर्गाची प्रतिक्षा यादी संबंधित माहिती मागितलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दिनांक १३.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसते. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही अपीलकर्त्यास अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांचा दिनांक ८.७.२०१० चा माहिती अधिकाराखालील अर्ज त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे हस्तदेय दिला होता. त्या अर्जामध्ये दिनांक १.४.१९९९ पासून आज पर्यंत प्रत्येक वर्षाची शिपायांची प्रतिक्षा यादीची प्रमाणित प्रत माहिती द्यावी. तसेच दिनांक १.४.१९९९ पासून श्री. अशोक रायभान चिमणकर यांना दिलेल्या नियुक्तीच्या संबंधी कार्यवाहीची प्रत मागितलेली होती. मात्र सदरची माहिती त्यांना माहिती अधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली नाही. तसेच प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, त्यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून पदभार हा दिनांक १.९.२०१० पासून स्विकारला आहे. तेंव्हाचे जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. श्रावणी राऊत हे होते. अपीलकर्ता यांचा दिनांक ८.७.२०१० चा माहितीचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला दिसून येतो. तथापी सदरचा अर्ज कार्यालयातील वरिष्ठ लिपिक श्री. निलेश मेश्राम यांचे कार्यासनाशी संबंधित असल्यामुळे त्यांचेकडे हा अर्ज होता. तथापी त्यांनी हा अर्ज माहिती देण्यासाठी जनमाहिती अधिकारी यांचे निदर्शनास मुदतीत आणून दिला नाही. तो अर्ज श्री. निलेश मेश्राम यांनी दडवून ठेवल्याचे दिसून आला. म्हणून त्याबाबत अपीलकर्ता यांचे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर सदरची बाब त्यांचे निदर्शनास आली. म्हणूनच सदरच्या अर्जाचा शोध घेतला असता सदरचा माहिती अधिकाराचा अर्ज हा श्री. निलेश मेश्राम, वरिष्ठ लिपिक यांचेकडे आढळून आला. मात्र त्यांनी सदरचा अर्ज वरिष्ठापुढे विहित मुदतीत सादर केला नाही म्हणून अपीलकर्त्यास ३० दिवसांचे मुदतीत माहिती देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. सदरचा अर्ज श्री. निलेश मेश्राम यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कां सादर केला नाही याचा कोणताही खुलासा श्री.

निलेश मेश्राम यांनी जनमाहिती अधिकारी किंवा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे सादर केलेला नाही असेही जनमाहिती अधिकारी यांनी नमुद केले. त्यामुळे माहिती देण्याच्या विलंबास सर्वस्वी श्री. निलेश मेश्राम हे जबाबदार दिसून येतात.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचा दिनांक ८.७.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज श्री. निलेश मेश्राम यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे कार्यवाहीसाठी सादर केलेला नाही. त्यांनी तो अर्ज त्यांचेकडे दडवून ठेवलेला होता म्हणून त्यांना पत्राद्वारे याबाबत विचारणा केली असता त्यांनी सदरचा अर्ज त्यांचेकउे उपलब्ध असल्याचे मान्य केले. मात्र सदरचा अर्ज मुदतीत जनमाहिती अधिकारी यांचेकडे कां सादर केला नाही त्याचा कोणताही खुलासा श्री. निलेश मेश्राम यांनी प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दिलेला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध व्हावी या उद्येशाने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ८.१०.२०१० रोजी व दिनांक १०.१२.२०१० रोजी ठेवली होती. सदरच्या सुनावणीस अपीलकर्ता हे उपस्थित झाले नाही. मात्र अपीलकर्त्याचा त्यांच्या अर्जानुसार माहिती उपलब्ध करुन देण्याचा निर्णय दिनांक १६.१२.२०१० रोजी त्यांनी दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आजच्या सुनावणीत नमुद केले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. तथापी सदरचा अर्ज हा श्री. निलेश मेश्राम, वरिष्ठ लिपिक यांचेकडे दिला होता. तथापी त्यांनी सदरचा अर्ज जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती देण्यासाठी ३० दिवसांचे मुदतीत सादर केलेला नाही म्हणून ३० दिवसांत माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देता आली नाही. मात्र प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाचे सुनावणीचे वेळी माहितीचा अर्ज हा श्री. निलेश मेश्राम, वरिष्ठ लिपिक यांचेकडे प्राप्त झाला होता. त्यांनी त्या अर्जावर मुदतीत कार्यवाही होण्यासाठी कोणत्याही प्रकारची कार्यवाही न करता सदरचा अर्ज दडवून ठेवलेला दिसून येतो. म्हणून अपीलकर्त्यास ३०

दिवसांचे मुदतीत माहिती उपलब्ध न होण्यासाठी विलंब झालेला असून सदरच्या विलंबास सर्वस्वी श्री. निलेश मेश्राम हे जबाबदार दिसून येतात. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(५) अन्वये जनमाहिती अधिकारी ज्यांचे सहाय्य घेतो असे अधिकारी देखील जनमाहिती अधिकारी म्हणून समजण्यात येतात. म्हणून प्रस्तुत प्रकरणी श्री. निलेश मेश्राम हे जनमाहिती अधिकारी यांना सहाय्य करीत असल्यामुळे त्यांना जनमाहिती अधिकारी असे समजण्यात येत असून माहिती देण्याच्या विलंबास ते जबाबदार दिसून येतात. माहिती देण्यास कां विलंब झाला याबद्यल कोणताही खुलासा त्यांचेकडून प्राप्त झालेला नाही. म्हणून सदरच्या विलंबास श्री. निलेश मेश्राम हे जबादार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये त्यांना लागू असलेल्या सेवाशर्ती नियमानुसार त्यांची विभागीय चौकशीची शिफारस करणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडील दिनांक ८.७.२०१० च्या माहितीच्या अर्जातील माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने अन्यथा व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्त्यास विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांत माहिती उपलब्ध झालेली दिसून येत नाही म्हणून माहिती उपलब्ध होण्याच्या विलंबास श्री. निलेश मेश्राम हे सर्वस्वी जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द त्यांना लागू असलेल्या सेवाशर्तीनुसार माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकाऱ्यांनी करावयाची आहे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४३१-१४३४/२९.१२.२०१०

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५३६/२०१०.

श्री. विजय टिकाराम साखरे,
मु. पो. सिव्हील लाईन,
ता. साकोली, जि. भंडारा ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सतिश लिल्हारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, साकोली,
जि. भंडारा.

श्री. माणिक संपतराव शेंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्राम पंचायत कार्यालय, साकोली,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१२.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३१.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.७.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी ग्राम पंचायत कार्यालय, साकोली

... २

यांचेकडे अर्ज करुन ग्रामपंचायत कार्यालयातील कामकाजासंबंधी एकूण १ ते ७ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती दिनांक १.१.२००५ ते आजपर्यंत या कालावधीची त्यांनी मागितलेली आहे. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी दिनांक २०.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगासमोर असे नमुद केले की, ग्रामपंचायत, साकोली बाबत त्यांनी ग्रामपंचायत कामकाजाचे संबधी एकूण १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. अपीलकर्ता यांनी माहितीच्या अर्जात ते दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमुद करुन माहिती विनामुल्य मागितलेली दिसते. अपीलकर्ता यांनी सुनावणीत असे नमुद केले की, त्यांचे वडील श्री. टिकाराम मारोती साखरे हे दारिद्रय रेषेखालील कुटुंबात मोडत असून त्यांचा मुलगा म्हणून दारिद्रय रेषेखाली मोडतो म्हणून त्यांना विनामुल्य माहिती मिळण्यास त्यांनी विनंती केली. जनमाहिती अधिकारी यांचेकडून कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी, पंचायत समिती, साकोली यांचेकडे दिनांक २०.९.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिती, साकोली यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा दिनांक २६.७.२०१० चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक २६.७.२०१० रोजी प्राप्त झाला. मात्र सदरच्या अर्जात अपीलकर्त्याने दारिद्र रेषेखालील व्यक्ती म्हणून नोंद केलेली आहे त्यामुळे अपीलकर्त्याचे दारिद्रय रेषेखालील कुटुंबाबाबतची तपासणी केली असता अपीलकर्ता यांचे वडील श्री. टिकाराम मारोती साखरे यांना दारिद्रय रेषेखालील कुटुंब प्रमाणपत्र दिलेले आहे. मात्र श्री. विजय टिकाराम साखरे हे वडीलांपासून वेगळे राहत असून त्यांची पत्नी उपजिल्हा रुग्णालय, साकोली येथे चतुर्थ श्रेणी पदावर शिपाई म्हणून कार्यरत आहेत. त्यामुळे अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील कुटुंबात मोडत

नाही. तसेच अपीलकर्ता यांचे वडील श्री. टिकाराम मारोती साखरे नावाची दारिद्रय रेषेखालील दाखला असून त्या दाखल्याचा माहिती घेण्याकरिता अपीलकर्ता हे दुरुपयोग करतात म्हणून अपीलकर्ता यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा नोंद करण्याचे पत्र तहसीलदार यांनी दिनांक २५.११.२०१० रोजी ग्राम विकास अधिकारी यांना दिलेले आहे. यावरुन अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली येत नाही आणि दारिद्रय रेषेखाली त्यांचे वडीलांचे दाखल्याचे ते दुरुपयोग करीत आहेत असे दिसून येते असे जनमाहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक १६.८.२०१० च पत्र व दिनांक २३.११.२०१० च्या पत्राने अपीलकर्ता यांना ते बीपीएल खाली येत नाही असे कळविलेले आहे. तसेच बीपीएल खाली असल्याचे त्यांचे प्रमाणपत्र किंवा रेशनकॉर्डची प्रत त्यांना मागितली होती. मात्र अपीलकर्त्याने ती पुरविली नाही म्हणून अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती ग्राम पंचायतीने पुरविली नाही. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा खर्च सुमारे १० ते १२ हजार रुपये अपेक्षित आहे. एवढया मोठया प्रमाणातला खर्च ग्राम पंचायतला सोसावा लागेल म्हणून अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली मोडत नसल्यामुळे त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, साकोली यांनी असे नमुद केले की, अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दिनांक २०.९.२०१० रोजी दाखल झाले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी दिनांक २५.१०.२०१० रोजी ठेवण्यात आली होती त्या दिवशी अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे पुढील सुनावणी दिनांक ११.११.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय देण्यात आला. सदरच्या निर्णयात असे नमुद केले की, अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप मोठया प्रमाणात असल्यामुळे माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावी व अतिआवश्यक माहिती मागितल्यास त्यांना माहितीची सत्यप्रत नियमानुसार पुरविण्यात यावी असे त्यांनी निर्णय दिला असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६. अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली मोडत नाही. तसेच अपीलकर्ता हे त्यांचे

वडील श्री. टिकाराम मारोती साखरे यांच्या नावाचा दारिद्र रेषेखाली दाखला असून त्या दाखल्याचा माहिती घेण्याकरिता दुरुपयोग केलेला आहे. म्हणून अपीलकर्ता यांचेवर फौजदारी गुन्हा नोंदविण्याचे आदेश तहसीलदार यांनी ग्राम विकास अधिकारी यांना दिनांक २५.११.२०१० च्या पत्रावरुन दिसून येते. यावरुन असे सिध्द होते की, अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली मोडत नाही. म्हणून ते विनामुल्य माहिती प्राप्त करण्यास पात्र दिसत नाही. तथापी अपीलकर्त्याने माहिती अधिकार नियमानुसार फीचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल व आजच्या सुनावणीत अपीलकर्ता यांनी फी भरण्याचे मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अशंतः मंजूर करण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून फीचा भरणा करावा व अपीलकर्त्याने फीचा भरणा केल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती कागदपत्राचे स्वरुपात उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**

HIREKHAN/VGBD/१४३५-१४३८/३१.१२.२०१०

**राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक १५३५/२०१०.**

श्री. विजय टिकाराम साखरे,
मु. पो. सिव्हील लाईन,
ता. साकोली, जि. भंडारा ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सतिश लिल्हारे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, साकोली,
जि. भंडारा.

श्री. शैलेंद्रकुमार लंजे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय, जांभळी/सडक,
ता. साकोली, जि. भंडारा. ..... **उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३१.१२.२०१०)**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक ९.११.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २२.११.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३१.१२.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या अपीलाची सुनावणी आज दिनांक ३१.१२.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी त्यांचेकडील दिनांक ६.८.२०१० चा माहिती अधिकार खालील अर्जान्वये जनमाहिती

अधिकारी तथा ग्रामसेवक, जांभळी/सडक यांचेकडे जांभळी/सडक ग्रामपचायत कार्यालयातील कामकाजासंबंधी १ ते ७ मुद्यांवरती माहिती मागितलेली दिसून येते. तसेच अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत नमुद केले असून विनामुल्य माहितीची मागणी केलेली दिसून येते. तथापी विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्त्यानी प्रथम अपील दिनांक २४.९.२०१० रोजी दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे नमुद केले की, जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, जांभळी/सडक यांचेकडे दिनांक ६.८.२०१० रोजी माहिती अधिकाराखाली अर्जान्वये ग्रामपंचायत जांभळी/सडक कार्यालयातील कामकाजाचे संबंधी १ ते ७ मुद्यांवर माहिती मागितली होती. तसेच अपीलर्ता हे दारिद्रय रेषेखाली मोडत असल्यामुळे त्यांनी विनामुल्य माहिती मागितली होती. तथापी त्यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नाही. तसेच प्रथम अपीलाचा निर्णयानंतरही अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही असे त्यांनी आयोगाचे समोर सुनावणीत नमुद केले.

४. जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दिनांक ६.८.२०१० रोजी प्राप्त झाला. अपीलकर्त्यानी मागितलेली माहिती ही मोठया स्वरुपात होते म्हणून संपूर्ण माहितीची छाननी केली असता दिसून आले की, सदरच्या कागदपत्राच्या झेरॉक्स प्रतीचा खर्च अंदाजे १० ते १५ हजार रुपये होण्याची शक्यता आहे. म्हणून जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिनांक ३०.८.२०१० रोजी पत्राने असे कळविले की, आपण मागितलेल्या माहितीचा खर्च रुपये १० ते १५ हजार अपेक्षित आहे. परंतु सध्या ग्रामपंचायतीची आर्थिक परिस्थिती झेरॉक्स प्रती काढून देण्यासारखी नाही म्हणून ग्राम पंचायतची आर्थिक परिस्थिती हलाकीची असल्यामुळे आपण कार्यालयात कार्यालयीन वेळेत येऊन ग्रामपंचायतची कागदपत्रे पाहून आवश्यक तेवढी माहिती प्राप्त करुन घ्यावी असे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले. मात्र अपीलकर्ता माहिती प्राप्त करण्यासाठी व कागदपत्रे पाहण्यासाठी उपस्थित झाले नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक यांनी सांगितले.

५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपीलकर्ता यांचे प्रथम अपील त्यांचेकडे दिनांक २४.९.२०१० रोजी दाखल झाले. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक २५.१०.२०१० रोजी घेण्यात आली व निर्णय देण्यात आला. सदरच्या निर्णयात असे नमुद करण्यात आले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व्यापक स्वरुपात आहे. तसेच ग्राम पंचायतीची आर्थिक परिस्थिती झेरॉक्स काढण्याचा खर्च पेलण्यासारखी नाही. म्हणून अपीलकर्त्याला माहिती दाखवून आवश्यक ती माहिती देण्यात यावी. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपीलकर्ता ग्रामपंचायत कार्यालयात माहितीचे निरिक्षण करण्यासाठी व पाहणी करण्यासाठी उपस्थित झाले नाही असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले.

६. अपीलकर्ता, जनमाहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तुत प्रकरणी असे दिसून येते की, अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखाली मोडत नाही असे आयोगाकडे दाखल झालेले अपील क्रमांक १५३६/२०१० मध्ये दिसून आलेले आहे. कारण अपीलकर्ता यांचे जवळ स्वतंत्रपणे दारिद्ररेषेखालील कुटुंबाचे प्रमाणपत्र नाही. तथापी ते त्यांचे वडील श्री. टिकाराम मारोती साखरे यांचे दारिद्रय रेषेखालील प्रमाणपत्राचा दुरुपयोग करतात म्हणून तहसीलदार, साकोली यांनी दिनांक २५.११.२०१० च्या पत्राने ग्राम विकास अधिकारी, साकोली यांना त्यांचे विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिलेले आहेत. म्हणून अपीलकर्ता हे दारिद्रय रेषेखालील कुटुंबात मोडत नाही हे सिध्द होते. त्यामुळे ते विनामुल्य माहिती प्राप्त करुन घेण्यास पात्र ठरत नाही. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची आवश्यक ती नियमाप्रमाणे फी भरल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच माहितीची फी भरण्याबाबत अपीलकर्ता यांनी आयोगासमोर संमती दिली म्हणून अपीलकर्त्याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

**<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्राम पंचायत, जांभळी/सडक यांचे कार्यालयाकडे आवश्यक त्या माहितीची फीचा भरणा करावा व त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी फी भरुण प्राप्त करुन घ्यावी.

२) अपीलकर्ता यांनी माहितीची फी भरल्यानंतर जनमाहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(पी. डब्ल्यू. पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

**जावक क्रमांक :- दिनांक :-**

**मा. राज्य माहिती आयुक्त, नागपूर खंडपीठ, नागपूर यांचे मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**

निवड नस्ती

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ, नागपूर.**